सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १६ जून २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिका-इराणमध्ये शांतता करार

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : गेली अनेक महिने अमेरिका, इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगाला फटका बसला आहे. जगाची अर्थव्यवस्था ढासळली होती. संघर्षाच्या २-३ महिन्यांनंतर आता अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार होण्याच्या चर्चा सुरू आहेत. स्वित्झर्लंडमध्ये शुक्रवारी या शांतता कराराची स्वाक्षरी होणार असल्याच्या चर्चा सुरू असून आता इस्रायलच्या प्रतिक्रियेनंतर परिस्थिती पुन्हा अस्थिर होईल अशी चिंता व्यक्त होत आहे.

इस्रायल आणि अमेरिकेने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणविरुद्ध युद्ध सुरू केलं. दोन्ही देशांनी संयुक्तपणे हवाई हल्ले करण्यास सुरुवात केली. यामध्ये इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांची हत्या करण्यात आली. यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्यामुळे जागतिक इंधनसंकट निर्माण झालं. या संघर्षानंतर आता अखेर अमेरिका आणि इराणकडे एक्झिट प्लॅन तयार आहे. पण इस्रायलच्या भूमिकेमुळे हा प्लॅन यशस्वी होईल का आणि अनेक महिन्यांच्या संघर्षावर पूर्णविराम लागेल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

१९ जून रोजी इराण आणि अमेरिकेमध्ये होणाऱ्या शांतता कराराचे काही तपशील समोर आले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी याबद्दल घोषणा केली होती. इराणस्थित मेहर न्यूज एजंसीने या प्रस्तावाबद्दल माहिती जाहीर केली. होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा एकदा खुली करूण इराणवरील अनेक आर्थिक निर्बंध हटवण्याचे उद्देश्य आहे. अद्याप या करारामध्ये नेमकं काय आहे हे दोन्ही देशांकडून जाहीर करण्यात आले नाही.



# २२ जूनपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

तभा वृत्तसेवा



मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै या कालावधीत मुंबईत होणार आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सोमवारी अधिवेशनाच्या वेळापत्रकावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राज्याचे राज्यपाल विष्णू देव वर्मा यांच्या मान्यतेने विधिमंडळ सचिवालयाकडून यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली असून, २२ जून रोजी सकाळी ११ वाजता विधानसभेचे, तर दुपारी १२ वाजता विधान परिषदेचे कामकाज सुरू होईल. या अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीतील अटी, पीक विम्याचे प्रलंबित प्रश्न आणि अरबी समुद्रातील एल निनोच्या प्रभावामुळे रेंगाळलेला मान्सून यांमुळे बळीराजासमोर निर्माण झालेले संकट यावर वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे. यासोबतच राज्यातील ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा निर्माण झालेला गुंता, कायदा व सुव्यवस्थेची स्थिती आणि बेरोजगारी या मुद्द्यांवरून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळू शकतो. तीन आठवड्यांच्या या नियोजित सत्रात अनेक महत्त्वपूर्ण विधेयके आणि शासकीय कामकाज मंजुरीसाठी पटलावर ठेवले जाणार आहेत. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाने २९ पैकी २७ विधेयके मंजूर करून घेत विलंबाशिवाय कामकाज चालवले होते, तसेच विधानसभेचे कामकाज तब्बल १९७ तासांपेक्षा अधिक काळ चालले होते. त्याच धर्तीवर या पावसाळी अधिवेशनातही जास्तीत जास्त शासकीय कामकाज उरकून घेण्याचा मानस विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी व्यक्त केला आहे. या अधिवेशनात सरकारकडून महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठीच्या 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' सह इतर अनेक महत्त्वाचे कायदे संमत करून घेण्याची तयारी सुरू आहे.

# कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना मारहाण

वृत्तसंस्था

जयपूर : कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना मारहाण झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अभिजीत दीपके यांच्यावर राजस्थानच्या जयपूर येथे हल्ला करण्यात आला आहे. अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वात आज कॉक्रोच जनता पार्टीचे राजस्थानच्या जयपूर येथे आंदोलन आयोजित करण्यात आलं होतं. या आंदोलनात तरुणांची प्रचंड मोठी गर्दी जमा झालेली होती. या गर्दीत अभिजीत दीपके यांना त्यांच्या एका कार्यकर्त्याने खांद्यावर उचलून घेतलं होतं. यावेळी जोरदार घोषणाबाजी केली जात होती. आंदोलन एकदम जोरात सुरु होतं. पण याचवेळी गर्दीचा फायदा घेत एक जमाव अभिजीत दीपके यांच्या जवळ आला. या जमावाकडून अभिजीत दीपके यांच्यावर हल्ला करण्यात आला. अभिजीत दीपके यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. या व्हिडिओत पांढरा शर्ट परिधान केलेले अभिजीत दीपके यांना त्यांच्या एका कार्यकर्त्याने खांद्यावर घेतलेले बघायला मिळत आहे. ते भर गर्दीतून आंदोलनात पुढे जात आहेत. याचवेळी एक जमाव अभिजीत दीपके यांच्यावर हल्ला करतो. अज्ञात एक इसम अभिजीत दीपके यांच्या कानशिलात लगावतो. तसेच इतरही काही जण हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. यावेळी मोठा गोंधळ उडतो. या गोंधळात अभिजीत दीपके याच्यावर हल्ला करणाऱ्यांना इतर आंदोलक घेरतात. आंदोलकांकडून हल्ला करणाऱ्या जमावातील काही जणांना चांगलाच चोप दिला जातो. या घटनेनंतर हल्ला करणारे घटनास्थळावरुन फरार झाल्याचं वृत्त समोर येत आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. नीट पेपरफुटी प्रकरणावरून अभिजीत दीपके यांच्याकडून वारंवार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. अभिजीत दीपके भारतात आल्यापासून वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलन करत आहेत. आधी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर त्यांच्या नेतृत्वात आंदोलन झालं होतं. त्यानंतर पुण्यात आंदोलन झालं. त्यानंतर आज राजस्थानच्या जयपूरमध्ये त्यांच्याकडून आंदोलन केलं जात होतं. पण या आंदोलनादरम्यान अभिजीत दीपके यांना मारहाण करण्यात आल्याचं वृत्त समोर येत आहे.



## भरधाव वेगातील मर्सिडीसच्या अपघातात दोघांचा मृत्यू

वृत्तसंस्था

बंगळुरु: भरधाव वेगातील मर्सिडिज बेंझ अनियंत्रित होऊन रस्त्यावरील दुभाजकाला आदळली. धडक अतिशय भीषण होती. या अपघातात कारमध्ये असलेल्या एका कार डीलरचा आणि त्याच्या मैत्रिणीचा जागीच शेवट झाला. कर्नाटकातील बंगळुरु ग्रामीण जिल्ह्यात असलेल्या सॅटेलाईट टाऊन रिंग रोडमध्ये हा भीषण अपघात घडला.

काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात मृत पावलेल्यांची ओळख पटली आहे. रिझवान (३०) आणि सज्जिया अशी दोघांची नावं आहेत. रिझवान पेशानं जुन्या कारचा व्यवहार करायचा. तो डीलर म्हणून कार्यरत होता. रिजवान विवाहित असून त्याला दोन मुलं आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिझवान त्याच्या एका क्लाईंटची मर्सिडिज बेंझ कार घेऊन सज्जिया सोबत देवनहळ्ळीच्या दिशेनं गेला होता. परतीच्या प्रवासात तो होसकोटे जवळील पुलावरुन येत होता. तेव्हा त्याचं कारवरील नियंत्रण सुटलं. मर्सिडिज दुभाजकावर आदळली. अपघात इतका भीषण होता की कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. रिझवान कारमधून बाहेर फेकला गेला. त्याचं शव रस्त्याच्या बाजूनं वाहणाऱ्या नाल्यात सापडलं. तर त्याची मैत्रीण सज्जिया रस्त्यावर पडली. पोलिसांनी शोध मोहीम राबवून रिझवानचं शव नाल्यातून बाहेर काढलं. नाला खोल असल्यानं शव बाहेर काढताना बऱ्याच अडचणी आल्या.

# ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा

मुंबई : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला नाटककार गो. ब. देवल स्मृतिदिन पुरस्कार वितरण सोहळा आणि कलावंत मेळावा यशवंतराव चव्हाण नाट्य संकुल, माटुंगा, मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात ज्येष्ठ नाट्य-सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नाट्य-सिने अभिनेत्री स्वाती चिटणीस यांचा विशेष गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थिती पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार म्हणाले, नाट्य परिषदेचे काम कलाकार शोधणे, त्यांना घडवणे आणि त्यांना रंगमंच उपलब्ध करून देणे यासाठी मराठी नाट्य परिषदेने हाती घेतलेल्या उपक्रम 'नाट्यकला अकादमी' सांस्कृतिक विभाग तन, मन आणि धनाने ठामपणे पाठिंबा देईल व सोबत काम करेल. बेस्टच्या काही आगारांमध्ये नाट्यगृहे आणि चित्रपटगृहे उभारण्याचा आमचा मानस आहे. तसेच महानगरपालिकेच्या नाट्यगृहांच्या भाड्यात दरवर्षी ५ टक्के वाढ न करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. अभिनेत्री स्वाती चिटणीस यांनी पुरस्कारानंतर आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, रंगभूमीच्या सुंदर या प्रवासात रंगभूमीशी माझं नातं अनेक पदरांनी समृद्ध होत गेलं. रंगभूमी माझी गुरू आहे, माझी मैत्रीण आहे. या रंगमंचाने मला सुखाची उभारी दिली, अनेक आयुष्यं जगण्याची संधी दिली. दुःख खोलवर समजून घ्यायला आणि ते वाटून घ्यायला शिकवलं. नाटक मनाच्या जखमा भरून काढू शकतं. नाटक नटाला आरसा दाखवतं. रंगभूमीने मला बोलण्याची ताकद दिली, तर समोरच्याचं ऐकण्याची नम्रताही शिकवली. हा पुरस्कार केवळ माझा नाही. हा पुरस्कार मिळाला याचा आनंद आहेच; पण त्याहून मोठा आनंद म्हणजे महाराष्ट्राच्या पुरोगामी संस्कृतीत माझा जन्म झाला याचा अभिमान आहे. ज्यांनी माझ्या क्षमतेवर विश्वास ठेवला त्या निर्मात्यांचा, दिग्दर्शकांचा, सहकलाकारांचा आणि माझ्या कुटुंबीयांच्या प्रोत्साहनाचा या यशात मोठा वाटा आहे. पडद्यामागे काम करणाऱ्या सर्व कलावंतांचेही योगदान तितकेच महत्त्वाचे आहे. विशेषतः मराठी रंगभूमीवर बॅकस्टेज काम करणारे ज्या जिव्हाळ्याने आमची काळजी घेतात, त्याची नोंद घेतलीच पाहिजे.



# कोकणवासियांचा रेल्वे प्रवास सुखकर होणार!

## २६३ किमी लांब मार्गाचं दुपदरीकरण होणार

तभा वृत्तसेवा

मुंबई: कोकण रेल्वेच्या विस्ताराची कोकणवासी गेली अनेक वर्ष प्रतीक्षा करत आहेत. आता कोकणवासियांचं स्वप्न सत्यात उतरणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणावर काम सुरू होणार आहे. तब्बल २६३ किलोमीटर लांब मार्गावर दुपदरीकरण, तीन नवीन रेल्वे स्थानक आणि अतिरिक्त लूप मार्गांचा विकास करण्याची योजना आहे. यामुळे कोकण रेल्वेचा महाविस्तार होणार आहे. कोकण रेल्वेच्या विस्तारासाठी पाच वर्षीय प्लॅन तयार केला गेला आहे. यासाठी एकूण ४७०.०८ कोटींचा खर्च अपेक्षित असून रेल्वे बोर्डाकडे याचा प्रस्ताव पाठवला आहे अशी महिती कोकण रेल्वेचे संचालक आणि व्यवस्थापक संतोष कुमार झा यांनी 'मिड-डे'सोबत बोलताना दिली. रायगड जिल्ह्यातील रोह्यापासून ते कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील ठोकूरदरम्यान ७४० किमी लांब मार्गावरील कोंडी फोडण्याच्या हेतूने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. ठोकूर ते मुकंबिका रोड-ब्यनदूर या मार्गावर ११२ किमी तर वैभववाडी ते माजोर्डा या मार्गावर १५१ किमी असं एकत्र २६३ किलोमीटर मार्गावर दुपदरीकरण करण्यात येणार आहे. रोहा-मडगाव पट्ट्यावर क्षमतेपेक्षा १४३ टक्के तर मडगाव ते ठोकूर पट्ट्यावर क्षमतेपेक्षा १२८ टक्के अधिक प्रवासी प्रवास करतात असं एका नोव्हेंबर २०२५मध्ये झालेल्या सर्वेक्षणात समोर आलं होतं. त्यामुळे या मार्गाचं दुपदरीकरण करण्याची योजना तयार केली. या प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला असून जून ३०पर्यंत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. आतापर्यंत कोकण रेल्वे मार्गावर केवळ ५४.६६ किमी मार्गाचे दुपदरीकरण करण्यात आलं आहे.



# 'जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर आम्ही अंधविश्वास ठेवतो':आदित्य ठाकरे

तभा वृत्तसेवा

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात सध्या सुरु असलेल्या घडामोडींकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकतीच पक्षाच्या सर्व लोकसभेच्या खासदारांची बैठक घेतली. या बैठकीला काही खासदार हे ऑनलाईन उपस्थित होते. ठाकरेंच्या पक्षातील काही खासदार हे एक गट स्थापन करुन एनडीएला पाठिंबा देणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. पण खासदार संजय राऊत यांनी या वृत्ताचं खंडन केलं आहे. पक्षाचे सर्व खासदार एकजूट असल्याचे संजय राऊत म्हणाले आहेत. आमदार आदित्य ठाकरे यांनीदेखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. सर्व अफवा असून, या अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आदित्य ठाकरेंनी आवाहन केलं आहे. पण जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर अंधविश्वास ठेवतो, असंही आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.

आपण अफवांवर विश्वास ठेवू नका. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मी, आम्ही पथ्य पाळलं आहे की, जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर आम्ही अंधविश्वास ठेवतो. काही लोकं अंधभक्त असतात, आम्ही अंधविश्वासी ठेवणारे लोकं आहोत. २०२४ च्या लाटेमध्ये सगळे जे काही निवडून आलेले खासदार आहेत, उद्धव ठाकरे प्रत्येक मतदारसंघात गेले आहेत. आम्ही असतील, ज्येष्ठ नेते शरद पवार असतील, आम्ही सर्वांनी प्रचार केला. सर्वसामान्य जनतेने या खासदारांना मशालीच्या चिन्हावर निवडून दिलं आहे, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

आमच्या खासदारांची काल बैठक पार पडली. या बैठकीला काही प्रत्यक्ष उपस्थित होते तर काही ऑनलाइन उपस्थित होते. लोकांनी विश्वास ठेवून मतदान केलं आहे आणि सगळे सोबत आहेत. आमची काल रात्री जिल्हा प्रमुखांसोबत बैठक झाली त्यामध्ये सर्वजण होते, असं आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व ममता बॅनर्जी यांच्या नावावर जिंकले आणि आता सरकार बदलल्यानंतर उड्या मारून पळत आहेत. आमची केस आणि राष्ट्रवादीची केस ही साडेचार वर्षांपासून सुरु आहे, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

तसं पाहायला गेलं तर संविधानात खूप मोठी तरतूद आहे, एखादा पक्ष फुटून, कुणीतरी पक्षाचं नाव चोरु शकतं, निवडणूक आयोग त्यांना पक्षाचं चिन्ह देखील देऊ शकतं ही खूप मोठी गोष्ट आहे. आताचे जे सरन्यायाधीश आहेत, त्यांच्याशी आम्ही पूर्ण सहमत आहोत. न्यायात उशिर होणं म्हणजे न्याय नष्ट करणं आहे. देशातल लोकशाही नष्ट होत आहे का? याचावरही विचार करणं गरजेचं आहे, अशी भूमिका आदित्य ठाकरे यांनी मांडली.



## मान्सून अचानक कुठे गायब झाला? सॅटेलाइट फोटोंनी वाढवली चिंता ; देशात ६४ टक्के कमी पाऊस

तभा वृत्तसेवा



मुंबई : जून महिना अर्धा संपत आला आहे. साधारणपणे याच काळात देशभरात मुसळधार पावसाची सुरुवात झालेली असते. नद्या, ओढे भरू लागतात, शेतकरी पेरणी करतात आणि उकाड्याने त्रस्त झालेल्या जनतेला दिलासा मिळतो. मात्र यंदा चित्र काहीसे वेगळे दिसत आहे. दक्षिण-पश्चिम मॉन्सूनने भारतात वेळेत प्रवेश केला असला तरी अचानक त्याची गती मंदावली आहे. इतकेच नव्हे तर सॅटेलाइट चित्रांमध्येही देशाच्या मोठ्या भागावर ढग अत्यंत कमी दिसत आहे.

भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार ४ जून ते १५ जून या कालावधीत देशभरात केवळ १९.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या काळात सरासरी ५३.७ मिमी पाऊस अपेक्षित होता. म्हणजेच देशात तब्बल ६४ टक्के पावसाची तूट आहे. यामुळे खरीप हंगाम, जलसाठे आणि पिण्याच्या पाण्याबाबत चिंता वाढू लागली आहे.

१५ जून रोजी खच्छ-ढ-३उ्ढ या भारतीय उपग्रहाने टिपलेल्या फोटोंमध्ये मध्य भारत, दक्षिण भारत आणि द्वीपकल्पीय भाग मोठ्या प्रमाणावर ढगविरहित दिसून आले. साधारणपणे जून महिन्यात देशाचा मोठा भाग पांढऱ्या ढगांच्या आच्छादनाखाली असतो. मात्र यंदा अनेक भाग कोरडे आणि स्वच्छ दिसत असल्याने हवामानतज्ज्ञही चिंतेत आहेत.

### समन्वयकपदी रामेश्वर नाईक

मुंबई : आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, साधू-महंत, आखाडे, कुंभमेळा प्राधिकरण आणि प्रशासन यांच्यात समन्वय राखण्यासाठी रामेश्वर नाईक यांची 'समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सचिवालयाकडून याबाबत अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथून काढण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशानुसार, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन यशस्वी व्हावे, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

### ...तर ५०० रुपये दंड

पुणे : पुणे विमानतळ परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विमानतळ प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांना सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी येणाऱ्या खासगी चारचाकी वाहनांमुळे टर्मिनल परिसरात होणारी गर्दी लक्षात घेऊन आता १५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ वाहन उभे ठेवल्यास ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव विमानतळ प्रशासनाने दिल्ली येथील मुख्यालयाकडे पाठवला होता. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर लवकरच या नियमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### परदेशी शिक्षण महागले

मुंबई : अमेरिकन डॉलर आणि इतर जागतिक चलनांच्या तुलनेत भारतीय रुपया १० टक्क्यांहून अधिक घसरल्याने परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे बजेट कोलमडले आहे. दरवर्षी लाखो भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात. मात्र, सध्या परदेशात जाऊन शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसमोर आणि त्यांच्या पालकांसमोर एक मोठे आर्थिक आव्हान उभे राहिले आहे. गेल्या एका वर्षात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया १० टक्क्यांहून अधिक घसरल्याने परदेशी शिक्षणाचा प्रवास अत्यंत महागडा झाला असून पालकांच्या खिशाला मोठी कात्री लागली आहे.

### सेन्सेक्स उसळला

मुंबई : अमेरिका आणि इराण यांच्यातील ऐतिहासिक शांतता करारानंतर जागतिक बाजारातील अनिश्चिततेला मोठा ब्रेक लागला असून त्याचा सकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारात पाहायला मिळाला. आठवड्याच्या पहिल्याच व्यवहाराच्या दिवशी गुंतवणूकदारांनी जोरदार खरेदी करत बाजाराला दमदार उंचीवर नेले. सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी मोठी झेप घेतली, तर रुपयानेही डॉलरसमोर मजबुती दाखवली.

### रेल्वेच्या कामाला गती

धुळे : उत्तर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाला थेट रेल्वेने जोडणाऱ्या मनमाड-इंदूर नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २ सप्टेंबर २०२४ रोजी या प्रकल्पाच्या उर्वरित सुमारे ३०९ किलोमीटर लांबीच्या भागाला मंजुरी दिली असून संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे १८ हजार ३६ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी बोरविहीर-नरडाणा या सुमारे ५१ किलोमीटरच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले होते. त्यामुळे या भागाचा अपवाद वगळून उर्वरित रेल्वे मार्गासाठी अंतिम मंजुरी देण्यात आली आहे.

### भाविकांची तोबा गर्दी

नाशिक : सोमवती अमावस्येच्या पावन पर्वाणिमित्त त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग येथे देशभरातून आलेल्या लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. पहाटेपासूनच मंदिर परिसर, कुशावर्त तीर्थ आणि शहरातील प्रमुख मार्गांवर भाविकांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. नमः शिवाय आणि हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण त्र्यंबकेश्वर नगरी शिवमय झाली होती. सोमवती अमावस्येचे विशेष महत्त्व लक्षात घेऊन अनेक भाविक रात्रीपासूनच दर्शनासाठी रांगेत उभे होते.

## 'गंगा माई की बेटियाँ' हिंदी जीईसीमध्ये प्रथम क्रमांकावर; कलाकारांनी मानले प्रेक्षकांचे आभार

तभा वृत्तसेवा




**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'गंगा माई की बेटियाँ' ने 2026 च्या 22 व्या आठवड्यात हिंदी जीईसी (जनरल एंटरटेनमेंट चॅनल) श्रेणीत प्रथम क्रमांक पटकावत 2.0 टीव्हीआरची नोंद केली आहे. मालिकेतील सिद्धू आणि स्नेहा या प्रमुख पात्रांच्या भावनिक कथानकाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिल्याने मालिकेला हे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

अलीकडेच कथानकात सिद्धू आणि स्नेहा वेगवेगळ्या विवाहांकडे वळताना दाखवण्यात आले होते. यामुळे चाहत्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. सोशल मीडियावर #BringSneDhuTogether हा ट्रेंड चालवत प्रेक्षकांनी त्यांच्या पुनर्मिलनाची जोरदार मागणी केली. अखेरीस दोघांचे लग्न झाल्यानंतर प्रेक्षकांच्या भावनांना योग्य न्याय मिळाला आणि मालिकेच्या लोकप्रियतेत मोठी भर पडली.

या यशाबद्दल अभिनेता शिझान खान म्हणाला की, प्रत्येक कलाकाराचे स्वप्न मालिका नंबर वन होण्याचे असते आणि आज ते स्वप्न पूर्ण झाले आहे. प्रेक्षकांच्या प्रेम व पाठिंब्यामुळेच हा टप्पा गाठता आल्याचे त्याने सांगितले.

अभिनेत्री अमनदीप सिधू हिनेही आनंद व्यक्त करताना सांगितले की, तिच्या कारकिर्दीत प्रथमच प्रमुख भूमिका असलेली मालिका अव्वल स्थानावर पोहोचली असून हा क्षण अविस्मरणीय आहे. संपूर्ण कलाकार व तंत्रज्ञांच्या मेहनतीला प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमाचे हे फळ असल्याचे तिने नमूद केले. सध्या मालिकेत सिद्धू आणि स्नेहाच्या वैवाहिक आयुष्याचा नवा प्रवास सुरू होत असून पुढील भागांत भावनिक व नाट्यमय घडामोडी पाहायला मिळणार आहेत. मालिका दररोज रात्री 9 वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## क्रॉस जीन्सने पहिले स्टोअर केले सुरू

**सोलापूर :** क्रॉस जीन्स या भारतातील एका आघाडीच्या महिला अ‍ॅपेरल ब्रँड ने महाराष्ट्रातील सोलापूर येथील सिटी हॉस्पिटल बिल्डिंगमध्ये आपले पहिले हाय स्ट्रीट स्टोअर सुरू केले आहे. या उद्घाटनासह ब्रँडच्या डेनिम-केंद्रित फॅशन उत्पादनांची उपलब्धता आता 4 हाय स्ट्रीट स्टोअर्स आणि देशभरातील एकूण 30 स्टोअर्सपर्यंत वाढली आहे. नवीन स्टोअरच्या भव्य उद्घाटनानिमित्त ग्राहकांना '2 किंवा अधिक खरेदी करा, 40% सूट मिळवा' या ऑफरसह इतरही विशेष ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे.

## आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर लाँच

**मुंबई:** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर लाँच केले आहे, जो इन-बिल्ट (अंगभूत) हमीयुक्त मॅच्युरिटी लाभासह भारतीय आयुर्विमा क्षेत्रातील पहिली युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन (युलिप) आहे. आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर हा एक नॉन पार्टिसिपेटिंग लिंक्ड इंडिव्हिज्युअल सेव्हिंग्ज लाईफ इन्शुरन्स प्लॅन आहे आणि कर-कार्यक्षम हमीयुक्त लाभांचे आश्वासन शोधणाऱ्या ग्राहकांसाठी याची रचना करण्यात आली आहे. हे उत्पादन एक सोपा प्रस्ताव मांडते - एकच वेळ गुंतवणूक करा, पॉलिसीच्या मुदतीत लाईफ कव्हरद्वारे सुरक्षित राहा आणि पाच वर्षांच्या शेवटी मॅच्युरिटी लाभ मिळवा. मॅच्युरिटीवर, ग्राहकाला फंडाचे मूल्य किंवा हमीयुक्त मॅच्युरिटी लाभ यापैकी जी रक्कम जास्त असेल ती मिळते, ज्यामुळे हमीयुक्त परिणामाचे आश्वासन मिळते.

## 'नुवा' नेचुरल डायमंड कलेक्शन सादर

**मुंबई:** मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने 'नुवा' हा नेचुरल डायमंडच्या दागिन्यांचा नवीन कलेक्शन सादर केला आहे. निसर्गातील सूक्ष्म नमुने, पोत आणि बारकावे यांपासून प्रेरणा घेऊन हा कलेक्शन साकारण्यात आला आहे. आधुनिक लक्झरीला निसर्गाच्या सौंदर्याशी जोडणाऱ्या या कलेक्शनमध्ये अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या नैसर्गिक रचनांना कलात्मक स्वरूप देण्यात आले आहे— मग ते पट्टे, मधमाशांच्या पोळ्यांची आकर्षक रचना किंवा पृथ्वीने घडवलेले नैसर्गिक आकार आणि सेंद्रिय नमुने असोत.18 कॅरेट आणि 14 कॅरेट सोन्यात तयार करण्यात आलेल्या या कलेक्शनमध्ये नेचुरल डायमंडला रंगीत रत्न, सिरॅमिक कलर इनॅमलिंग आणि मल्टी-टोन रोडियम फिनिशच्या साहाय्याने अधिक आकर्षक बनविण्यात आले आहे.

## लंका प्रीमियर लीगचे प्रमोटर 'आयपीजी ग्रुप' ची मोठी घोषणा

**कोलंबो, श्रीलंका - १५ जून, २०२६:** लंका प्रीमियर लीगच्या (एलपीएल) सहाव्या हंगामाची सुरुवात १० जुलैपासून होणार आहे. या स्पर्धेच्या अगदी काही दिवस आधीच लीगला कोट्यवधी डॉलर्सचे मोठे आर्थिक बळ मिळाले आहे. लंका प्रीमियर लीगचे प्रमोटर 'इनोवेटिव प्रॉडक्शन ग्रुप' (इनोव्हेटिव्ह प्रॉडक्शन ग्रुप एफझेड, एलएलसी - आयपीजी) या कंपनीला अमेरिकेतील, शेअर बाजारात नोंदणीकृत असलेल्या कंपनीकडून हा मोठा आर्थिक निधी मिळाला आहे.

## 'तू ही रे दिल में'मधील संजयची भूमिका साकारताना खूप काही शिकायला मिळाले : अब्रार काझी

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवर १५ जूनपासून सुरू होणाऱ्या 'तू ही रे दिल में' या नव्या मालिकेबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली असून अभिनेता अब्रार काझी याने मालिकेतील संजय या व्यक्तिरेखेविषयी मनमोकळेपणाने भावना व्यक्त केल्या आहेत. प्रेम, नाती, त्याग आणि नियती यांचा वेध घेणारी ही मालिका भावनिक कथानकामुळे चर्चेत आहे.

या मालिकेत अब्रार काझी संजयची भूमिका साकारत असून प्रियांशी यादव आणि सिमरन रावल प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. संजय ही व्यक्तिरेखा संवेदनशील, जबाबदार आणि कुटुंबातील नात्यांना जपणारी आहे. इतरांच्या आनंदासाठी स्वतःच्या भावना बाजूला ठेवणारा आणि प्रत्येक निर्णय जबाबदारीने घेणारा तरुण म्हणून त्याची ओळख आहे.

या भूमिकेबाबत बोलताना अब्रार काझी म्हणाला की, संजयची व्यक्तिरेखा अनेक भावनिक स्तरांनी समृद्ध आहे. प्रेम आणि कर्तव्य यांच्यातील संघर्षातून त्याचा प्रवास घडतो. प्रत्येक प्रसंगात त्याच्या स्वभावाचा वेगळा पैलू समोर येत असल्याने ही भूमिका साकारताना कलाकार म्हणून बरेच काही शिकायला मिळाले. यापूर्वी केलेल्या भूमिकांपेक्षा संजय पूर्णपणे वेगळा असल्याने हा अनुभव अधिक संस्मरणीय ठरल्याचे त्याने सांगितले.

'तू ही रे दिल में' ही मालिका नातेसंबंधांचे विविध पैलू उलगडणारी असून प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करेल, असा विश्वास अब्रार काझीने व्यक्त केला. ही मालिका १५ जूनपासून दररोज सायंकाळी ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होणार आहे.

# दोन गटांच्या वादातून तरुणाचा खून; संतप्त जमावाचा ग्रामीण रुग्णालयात राडा, तोडफोडीने रुग्णांमध्ये भीती







तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१५ जून - शहरातील दोन भावांमधील कौटुंबिक वादाचे रूपांतर हिंसक संघर्षात होऊन २५ वर्षीय नाविद अक्रम शेख (रा. टिळकनगर) यांचा चाकू हल्ल्यात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी मध्यरात्री घडली. या घटनेनंतर संतप्त झालेल्या काही नागरिकांनी कन्नड ग्रामीण रुग्णालयात गोंधळ घालत तोडफोड केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आदिल खान उस्मान खान आणि वहाब उस्मान खान या दोघा भावांमधील कौटुंबिक वादामुळे दोन्ही बाजूंनी कन्नड शहर पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पोलीस ठाण्याबाहेर दोन्ही गटांमध्ये पुन्हा वाद झाला आणि त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. यावेळी भांडण सोडवण्यासाठी आलेल्या नाविद अक्रम शेख यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला.

गंभीर जखमी अवस्थेत नाविद यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. मृत्यूची माहिती समोर येताच संतप्त जमावाने रुग्णालय परिसरात गोंधळ घालत काही ठिकाणी तोडफोड केल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून संबंधित आरोपींविरुद्ध कन्नड शहर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आर. बी. सानप करत आहे . पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत रुग्णालय परिसरात बंदोबस्त वाढविला.

रुग्णालयात संतप्त जमावाचा गोंधळ; रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण

तरुणाच्या मृत्यूची माहिती समोर येताच कन्नड ग्रामीण रुग्णालयात काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. संतप्त जमावाने रुग्णालय परिसरात गोंधळ घालत तोडफोड केल्याने उपचारासाठी आलेल्या रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. अचानक झालेल्या गदारोळामुळे काही काळ धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली व रुग्णालय परिसरात बंदोबस्त वाढविण्यात आला. "गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, पण रुग्णालयांसारख्या जीव वाचवणाऱ्या ठिकाणांची तोडफोड करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आणि निष्पाप रुग्णांना वेठीस धरणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरत नाही," अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१५ जून :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामजी नगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.शाळा प्रवेश महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे फुले,टाळ्यांचा गजर आणि आनंददायी उपक्रमांच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले.नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

यावेळी शिक्षकांनी विविध खेळ,गाणी,गोष्टी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी निर्माण केली.पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात सकारात्मक वातावरणात झाल्याने विद्यार्थी,पालक आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी नायब तहसीलदार बहुरे साहेब यांनी शाळा भेट दिली या भेटीदरम्यान त्यांनी शाळेत बद्दल अत्यंत समाधानकारक वातावरण आहे असे नमूद केले.याप्रसंगी सोयगाव नगरपंचायतीच्या अध्यक्षा अशाबी तडवी ताई,व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे,उपाध्यक्ष वैशाली पवार, शाळेत समिती सदस्य योगेश बोखारे,माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू माळी,मनीषा जेठे,शांताराम पाटील शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले,शिक्षक गोपाल चौधरी यांनी मान्यवर यांचे आभार व्यक्त केले.

# राज्य अजिंक्यपद कोल्हापूरच्या नावावर; मुंबई उपविजेता, धुळे तृतीय

## १५ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेचा उत्साहात समारोप

तभ वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** राज्य हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या १५ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेचा आज उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. अंतिम सामन्यात कोल्हापूर संघाने मुंबई संघाचा २९-२४ असा पराभव करत राज्य अजिंक्यपद पटकावले. मुंबई संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर धुळे संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेतील उपांत्य फेरीचे सामनेही अत्यंत रंगतदार झाले. पहिल्या उपांत्य सामन्यात मुंबई संघाने धुळे संघावर १३ गोलांच्या फरकाने विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या उपांत्य फेरीत कोल्हापूर संघाने नागपूरचा ५ गोलांच्या फरकाने पराभव करून अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

अंतिम सामना प्रेक्षकांसाठी उत्कंठावर्धक ठरला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत एकमेकांना कडवी झुंज दिली. मात्र, निर्णायक क्षणी कोल्हापूरच्या खेळाडूंनी सरस कामगिरी करत मुंबईवर २९-२४ अशी मात केली आणि राज्य विजेतेपदावर आपले नाव कोरले. विजेत्या कोल्हापूर संघाकडून शिवराज पाटील आणि करण कोरगडे यांनी प्रत्येकी ८ गोलांची नोंद केली, तर पृथ्वीराज पाटील याने ५ गोल करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. मुंबईकडून वेद याने ८ गोल आणि प्रथम याने ६ गोल करत संघाला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले.

तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात धुळे संघाने नागपूरवर मात करत तिसरे स्थान पटकावले. धुळे संघाकडून हिमांशू याने तब्बल १६ गोलांची नोंद करत चमकदार कामगिरी केली, तर अथर्व याने ९ गोल केले. नागपूरकडून शक्य याने १० गोल आणि अथर्व याने ५ गोलांची नोंद केली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला मुख्य आयोजक उद्योजक अजिंक्य सावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य हँडबॉल संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे होते. यावेळी पंच समितीचे प्रमुख मिलिंद शिंदे, जिल्हा सचिव डॉ. सत्यजीत पगारे, मनीष पाटील, डॉ. रंजन बडवने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा संघटनेचे डॉ. सचिन पगारे, संजय सातदिवे, डॉ. मीनाक्षी मुलियार, डॉ. उज्वला सातदिवे, श्रीकांत शिंदे तसेच इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पाणी पुरवठा कर्मचाऱ्याचा हृदय विकाराने निधन;-घोसला गावात हळहळ



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव, दि.१५ जून :** तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठा कर्मचारी अनिल बाबूलाल तडवी(वय-५४) यांचे पाणी पुरवठा कर्तव्यावर असताना अचानक हृदय विकाराने निधन झाल्याची घटना रविवारी (दि.१४) सायंकाळी पाच वाजता घडली त्यांना तातडीने पिंपळगाव (हरे) ता.पाचोरा येथे उपचारासाठी दाखल केले असता त्यांना मृत घोषित केले.या घटनेमुळे घोसला गावात शोककळा पसरली आहे. रात्री उशिरा शवविच्छेदन करून त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,एक भाऊ,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

---दिवस भर पाणी पुरवठा करणारे अनिल तडवी अचानक सायंकाळी निधन झाल्याने ग्रामस्थांमध्ये हळहळ पसरली असून या घटनेमुळे शोककळा व्यक्त करण्यात येत आहे.

## नालंदा फाउंडेशन यांच्या वतीने रामनाथ धनवे यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मान




तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि १५ जून :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय संलग्न उपक्रमांतर्गत आयोजित राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात भगवती विद्यालय, बिडकीन, ता. पैठण, येथील आदरणीय रामनाथ साहेबराव धनवे यांना "उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२६ पत्रकार भवन पुणे येथे प्रदान करून गौरविण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध सिनेअभिनेते सुनील नाना गोडबोले , संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक जाधव तसेच त्यांच्या मान्यवर सहकाऱ्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रातील आपले समर्पित कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि समाजाभिमुख शैक्षणिक योगदान यांचा हा गौरव आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल रामनाथ धनवे यांचे शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरचा दिमाखदार प्रवेशोत्सव

तभा वृत्तसेवा



विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंदमय वातावरणात करत आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरने प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून शिक्षण, संस्कार आणि परंपरेचा सुंदर संगम घडवून आणत आहोत .

- भास्कर कुलकर्णी (मुख्याध्यापक )

**पैठण दि १५ :-** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी उत्साह, आनंद आणि जल्लोषात भव्य दिव्य प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, डॉ. राम लोंढे, किशोर भाकरे, नंदकिशोर मालाणी, भगवान काका कावसानकर,डॉ. अनिरुद्ध लोंढे,डॉ. भारत झारगड, रामनाथ केकान,सुरेश गायकवाड,श्रीमती नीता कायस्थ,गोकुळ खांडेकर,पत्रकार रमेश लिंबोरे, रमेश शेळके,कैलास बर्फे,सुभाष नवथर,नगरसेवक ज्ञानेश्वर दहिवाळ, योगेश धुपे,सतिश आखेगावकर,जनार्धन मिटकर,मिलिंद गोसावी, श्रीमती तोतला,नीता झारगड, अतिष गायकवाड,पोलीस पवार साहेब,मयुरेश औटे, मनिष बारे, विजय मुळे, विजय ठाणगे,प्रणित निकाळजे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# एव्हरेस्टवीर सानिका शाहचा इंडो-अमेरिकन सोसायटीतर्फे भव्य सत्कार

## परमेश्वर अय्यर यांच्या हस्ते मुंबईत गौरव!

**मुंबई:** जगातील सर्वोच्च शिखर 'माउंट एव्हरेस्ट'वर यशस्वी चढाई करून इतिहास रचणाऱ्या मुंबईच्या २२ वर्षीय कन्या सानिका शाह हिचा काल, दिनांक १२ जून २०२६ रोजी इंडो-अमेरिकन सोसायटीतर्फे एका विशेष सोहळ्यात गौरव करण्यात आला. फोर्ट, मुंबई येथील ऐतिहासिक 'किताब महाल' येथे आयोजित या भव्य सत्कार समारंभाचे अध्यक्षपद परमेश्वर अय्यर यांनी भूषवले. त्यांच्याच हस्ते सानिकाचा विशेष सत्कार करून तिच्या अजोड धैर्याला दाद देण्यात आली.

सानिका शाह हिने २० मे २०२६ रोजी अत्यंत प्रतिकूल हवामानाचा सामना करत माउंट एव्हरेस्ट (८,८४८.८६ मीटर) सर केले आणि आपले बालपणापासूनचे स्वप्न साकार केले. या गौरव सोहळ्यादरम्यान अध्यक्ष परमेश्वर अय्यर यांनी सानिकाच्या यशाचे कौतुक करताना सांगितले की, इतक्या तरुण वयात एव्हरेस्टसारखे आव्हान पेलणे हे केवळ शारीरिक क्षमतेचे नव्हे, तर मानसिक कणखरतेचे प्रतीक आहे आणि सानिकाचा हा प्रवास देशातील हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.



सानिका ही केवळ एक उत्तम गिर्यारोहक नसून ती एक अष्टपैलू कलाकारही आहे. तिने प्रसिद्ध 'व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनल' संस्थेतून 'बॅचलर ऑफ आर्ट्स इन ॲक्टिंग' (B.A. in Acting) ही पदवी मिळवली आहे. तसेच ती एक प्रशिक्षित भरतनाट्यम नृत्यांगना असून रंगभूमी, संगीत आणि अभिनयाचा तिला दांडगा अनुभव आहे. गिर्यारोहणासाठी आवश्यक असणारी सहनशक्ती तिने एक 'एंड्युरन्स ॲथलीट' म्हणून अनेक हाफ मॅरेथॉन आणि ५० किलोमीटरची अत्यंत खडतर अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण करून कमावली आहे.

माउंट एव्हरेस्टपूर्वी सानिकाने जगातील आणि हिमालयातील अनेक आव्हानात्मक शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे.

### जाहिर प्रकटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९२/२०२६. नि. क्रं.

१. सोनाली गणेश शिंदे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. निमखेडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गणेश शिवाजी शिंदे यांचा दिनांक ०६/०३/२०१७ रोजी निमखेडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत गणेश शिवाजी शिंदे यांचे वारस असुन मयत गणेश शिवाजी शिंदे यांच्या नावे बैंक ऑफ बडोदा शाखा शिंदाड पाचोरा येथे खाते क्रं. २२२२०१००००६१५१ मध्ये रक्कम रुपये ४८,०१९/- रक्कम आहे व सदर रक्कम काढण्यासाठी अर्जदार यांना वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १९/०६/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२०/०७/२०२६.

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

### जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११०/२०२६. नि. क्रं.

१. रेणुकाबाई दत्तात्रय मापारी, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. २. अमोल दत्तात्रय मापारी, वय ३५ वर्षे, धंदा खा. नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ३. शुभम दत्तात्रय मापारी, वय २९ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे. ४. अंजली दत्तात्रय मापारी, वय ३७ वर्षे, धंदा नौकरी, रा. सिल्लोड ता सिल्लोड जि छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दत्तात्रय (दत्तु) मुरलीधर मापारी यांचा दिनांक १७/०५/२०२६ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत दत्तात्रय (दत्तु) मुरलीधर मापारी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ११०६/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२०/०७/२०२६.

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

### जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११३/२०२६

अर्जदार :-१/- भास्कर नामदेव चव्हाण, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. रवळा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- संगीताबाई प्रकाश खैरे, वय ५१ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

-:- विरुद्ध -:-

गैरअर्जदार :- कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नामदेव भिका साबळे यांचा दि. २६.०१.२०२५ रोजी मौजे रवळा, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदारं क. १ व २ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार कं. १ व २ हे मयत नामदेव, भिका साबळे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. १५.०६.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ७.०७.२०२६ 23

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## परंड्याचे सुपुत्र प्रा.डॉ. राशीनकर यांचा जगातील टॉप ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ जून -**

परंडा येथील सुपुत्र व शिवाजी विद्यापीठातील आघाडीचे संशोधक गजानन शंकरराव राशीनकर यांचा जगातील टॉप ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश झाल्याने परंडा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल भाजप नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी दूरध्वनीद्वारे त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

प्रा. डॉ. राशीनकर यांनी स्तनाच्या कर्करोगावरील 'हायपरथर्मिया' आणि चुंबकीय नॅनो कणांच्या निर्मितीवर केलेल्या संशोधनाला भारतीय तसेच यूके पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोग उपचार क्षेत्रात नवी दिशा मिळाली असून नॅनो-मेडिसिन क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.



पर्यावरणपूरक रासायनिक संयुगे, कर्करोगविरोधी संयुगे आणि जैविकदृष्ट्या सक्रिय रेणूंच्या संश्लेषणावरील संशोधनासाठीही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या यशामुळे परंडा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून लवकरच त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सुजितसिंह ठाकूर यांनी सांगितले.

# 'तुतारी'च्या निनादात नवागतांचे स्वागत; बैलगाडीतून मिरवणुकीने रंगला प्रवेशोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ मध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे तुतारी व संबळाच्या निनादात औक्षण करून, गुलाबपुष्प देत बैलगाडीतून भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.

प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन त्यांना फुले व पेढे देण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. शाळेचे पालक शशिकांत जोशी यांनी आपल्या कन्येने एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांसाठी दालचा व जिलेबीची मेजवानी दिली.

या कार्यक्रमास नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ, नगरसेविका मंजुषाताई देशमाने, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष नागेश नाईक, जिल्हा परिषद सदस्या शीतल ढाले, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा किरण सुरवसे यांच्यासह बाळासाहेब हंगरगेकर, दुर्वास भोजने, सचिन ताकमोघे, सचिन ठेले, प्रसाद इंगळे, बाळासाहेब केसकर, प्रियांका नाईकवाडी, नितीन गायकवाड, अर्जुन भोजने आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या १६ विद्यार्थ्यांचा तसेच मार्गदर्शक शिक्षक जालिंदर राऊत, अनिल राठोड आणि रणजीत नाईकवाडे यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रेरणा दिली.

प्रवेशोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे शाळेत उभारण्यात आलेला आकर्षक सेल्फी पॉईंट. विद्यार्थी आणि पालकांनी सेल्फी काढून या आनंदोत्सवाच्या आठवणी जपल्या. उत्साह, आनंद आणि विद्यार्थ्यांच्या स्वागताचा अनोखा संगम असलेल्या या प्रवेशोत्सवाने शाळा परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक तुकाराम मोटे, अशोक शेंडगे यांच्यासह सहशिक्षक निर्मला कुलकर्णी, सतीश यादव, जालिंदर राऊत, वैशाली गोमारे, शरद कोळगे, पुष्पा काळे,दिगंबर थेटे, दत्ताभाऊ मेढे, शिक्षणसेवक रणजीत नाईकवाडे, अनिल राठोड, अतुल काकडे, कल्पना व्हटकर, संदीप माने यांनी परिश्रम घेतले.

## तुळजापूर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; तांत्रिक चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**

तुळजापूर शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ९.९९ कोटींच्या सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत नव्याने प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकल्पासाठी सुमारे ६ कोटी निधी वितरित झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पात बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये शंका निर्माण झाल्या आहेत.



बसविण्यात येणारे कॅमेरे STQC मान्यता प्राप्त आहेत का, त्यांचे थर्ड पार्टी निरीक्षण करण्यात आले आहे का, तसेच आवश्यक गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे का, याबाबत स्पष्ट माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

निकृष्ट दर्जाचे किंवा कमी क्षमतेचे कॅमेरे बसविण्यात आल्यास गुन्ह्यांच्या तपासासाठी आवश्यक असलेले स्पष्ट चित्रीकरण उपलब्ध होणार नाही. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यात अपयशी ठरू शकतो आणि कोट्यवधी रुपयांचा खर्चही वाया जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी संबंधित प्रकल्पाची तात्काळ तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच तुळजापूर शहरात केवळ उच्च दर्जाचे, मान्यताप्राप्त आणि तांत्रिक निकषांची पूर्तता करणारे सीसीटीव्ही कॅमेरेच बसविण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## नगरपरिषद शाळा क्र. २ मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ मध्ये इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे तुतारी व संबळाच्या निनादात स्वागत करत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून पायांचे ठसे घेण्यात आले तसेच त्यांना पेढे व फुले देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. पालक मेळावाही आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष नागेश नाईक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन झाडपिडे, केंद्रप्रमुख मोहन भोसले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

## मुस्लिम नववधूला 'कन्या सन्मान योजने'तून सोन्याची अंगठी भेट



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ जून -**

नगरसेविका मयुरी अमोल बिराजदार व अमोल दत्तात्रय बिराजदार यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'मा. बाळासाहेब ठाकरे कन्या सन्मान योजने' अंतर्गत मुस्लिम समाजातील अनिसा खाजा मैनोद्दीन आरब व इरफान खाजा मनोद्दीन शेख यांच्या विवाह सोहळ्यात नववधूस पाच ग्रॅम सोन्याची अंगठी व भरपेरावा आहेर देण्यात आला.

धर्म, जात व पंथ यापलीकडे जाऊन मानवतेच्या भावनेतून समाजसेवा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण या विचारसरणीवर आधारित ही योजना लोहारा शहरात सामाजिक सलोखा व एकोप्याचे प्रतीक ठरत आहे. यापूर्वीही विविध समाजघटकांतील अनेक कन्यांच्या विवाहप्रसंगी या योजनेतून मदतीचा हात देण्यात आला आहे.

यावेळी माजी सरपंच शंकरआण्णा जट्टे, आयुब शेख, बाबा शेख, सुधीर घोडके, इकबाल मुल्ला, हमजा खुट्टेपड, पत्रकार नीलकंठ कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत सामाजिक बंधुभाव वृद्धिंगत करणाऱ्या अशा योजनांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## पानगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव; विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ जून -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळाप्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुटीनंतरच्या पहिल्याच दिवशी शाळेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य व गणवेशांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्या वृषाली राहुल पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्या अनुजाताई कोकाटे, जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ पाटील नायगाव, राहुल पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

जाधवर यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली, तर देवकर सर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा पुन्हा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेली.

## कोष्टी समाज ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; ४६ हजारांचे शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ जून -**

कोष्टी समाज ट्रस्टच्या पुढाकाराने दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ३८ विद्यार्थ्यांना सुमारे ४६ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बागडे होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे आणि मोबाईलचा मर्यादित वापर करावा, असे आवाहन केले. या प्रसंगी महावितरणचे आदर्श गुणवंत कामगार म्हणून सन्मानित जयराज बाबर व सतीश दाते यांचाही गौरव करण्यात आला. बी.व्ही. सदानंदे तसेच कै.डॉ. श्रीकांत फलके यांच्या स्मरणार्थ शैलेश फलके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर, पेन, कंपास आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास विविध मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्ट पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव; नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ जून -**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी परंडा येथील संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत प्रेरणादायी संदेश दिला.

प्राचार्य संतोष भांडवलकर, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळेतील शैक्षणिक सुविधा, विविध उपक्रम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची माहिती दिली. प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध स्वागतपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी निवृत्त सुभेदार संभाजी पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नांगरे व समाधान शिंदे यांनी केले.

उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाची



आनंददायी सुरुवात केली.

## ४०३ कारवाया; ३.३८ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१५ जून -** धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी १४ जून रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एकूण ४०३ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून ३ लाख ३८ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.


सोलापूर तरुण भारत
नियमित वाचा...


## प्रभातफेरी, पुष्पवृष्टी आणि जल्लोषात रुईभर विद्यालयाचा प्रवेशोत्सव संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन, पुष्पवृष्टी करत तसेच वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने गावातून घोषणाबाजी करत प्रभातफेरीही काढण्यात आली.


शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना जिलेबी व खिचडीचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना सुभाषदादा कोळगे म्हणाले की, शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या संस्कारांचे बीजारोपण होणे अत्यंत आवश्यक आहे. संस्कारक्षम विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात. पालकांनीही मुलांच्या शिक्षणासोबत संस्कारांवर भर देऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करण्याचा सल्ला दिला. जीवनाचे ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले. विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करून सर्व विषयांचे सखोल ज्ञान आत्मसात करावे, असे सांगितले. गुरुजनांनी दिलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करून तसेच विद्यालयातील संस्कारांचे पालन करून उज्ज्वल भविष्य घडवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास माजी ग्राम पंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शेटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन कांबळे यांनी मानले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित या प्रवेशोत्सवामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## खुदावाडी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात; प्रभात फेरीतून शिक्षणाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१५ जून -**

ग्रामस्वच्छता अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुदावाडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस आणि शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. चला, नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहाने स्वागत करूया या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नवागत विद्यार्थ्यांचे शाळा परिवारात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह गावातून प्रभात फेरी काढून शिक्षणाचे महत्त्व जनजागृतीच्या माध्यमातून सांगण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास माजी केंद्रप्रमुख दगडू सालेगाव यांच्यासह ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी, ग्राम पंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गोड पदार्थ म्हणून शिराचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे प्रवेशोत्सव आनंददायी वातावरणात पार पडला. नव्या विद्यार्थ्यांच्या आगमनाने शाळा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## अग्रलेख

# मस्तीखोर महाशक्ती...

जगाला अमेरिका आणि रशियाच्या लष्करी शक्तीची जाणीव पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झाली. या दोन्ही महायुद्धांमध्ये तथाकथित लष्करी महाशक्ती असलेल्या जगातील या दोन्ही बलाढ्य देशांच्या तोंडाला जर्मनी आणि जपानने फेस आणला होता. आपले अस्तित्व वाचविण्यासाठी दुसऱ्या महायुद्धात तर शत्रू असलेले अमेरिका-रशिया यांना एकत्र यावे लागले होते. हिटलरने ऐन हिवाळ्यात रशियावर आक्रमण करण्याची चूक केली नसती तर युरोपचा नकाशा वेगळा दिसला असता. अतिपूर्वेकडील आक्रमक जपानला रोखण्यासाठी तर अमेरिकेला अणुबॉम्बचा वापर करावा लागला होता. जर्मनी आणि जपान या दोन्ही देशांनी महाशक्तींना घायकुतीला आणले होते. पहिले महायुद्ध चार वर्षे, तीन महिने तर दुसरे सहा वर्षे सुरू होते. या दोन्ही महायुद्धांमध्ये अपरिमित मनुष्य आणि वित्तहानी झाली. अनेक देशांच्या सीमा बदलल्या. काही छोट्या देशांची निर्मिती करण्यात आली. २० व्या शतकात पहिल्या आणि दुसऱ्या या विनाशकारी महायुद्धांनंतर जगात काही सीमित संघर्ष झाले. २१ व्या शतकातील दीर्घकाळ चालणारे युद्ध म्हणजे रशिया-युक्रेन संघर्ष होय, जो अजूनही संपलेला नाही. रशिया हा युक्रेनपेक्षा भौगोलिकदृष्ट्या तब्बल २८ पट मोठा आहे. नैसर्गिक साधने आणि लष्करी शक्तीचीही तुलना होऊ शकत नाही. एवढे सारे असूनही इवलासा युक्रेन गेली सव्वाचार वर्षे बलाढ्य रशियाशी दोन हात करतो आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेले हे युद्ध अजूनही संपलेले नाही. स्वतःला शक्तिशाली समजणाऱ्या रशियाच्या मर्यादा युक्रेनने उघड्या पाडल्या. केवळ लष्करी शक्तीच्या बळावर आपल्याला हवे ते प्राप्त करण्याच्या मर्यादाही जगाला दिसून आल्या. भौगोलिकदृष्ट्या रशिया आज जगातील सर्वांत मोठा देश असला तरी शेजारी देशांचा भूभाग गिळंकृत करण्याची लालसा कायम आहे. २०१४ मध्ये क्रिमिया गिळंकृत केल्यानंतर पुतिन यांची वक्रदृष्टी युक्रेनवर पडली आहे. याचा फटका बसतो आहे तो सामान्य नागरिकांना. नेमके किती सैनिक आणि नागरिक ठार झाले हे दोन्ही देशांनी अधिकृतपणे जाहीर केले नसले तरी आंतरराष्ट्रीय गुप्तचर संस्था आणि जगभरातील संघर्षांवर लक्ष ठेवणाऱ्या आणि संशोधन करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार रशियाची झालेली मनुष्यहानी प्रचंड आहे. रशियाने या युद्धात आतापर्यंत पावणे तीन लाखांच्या वर सैनिक गमावले आहेत. युक्रेनचेही १ लाख ४० हजारांच्या आसपास सैनिक ठार झाले. ब्रिटनची गुप्तचर संस्था गव्हर्नमेंट कम्युनिकेशन्स हेडक्वार्टर्सने तर या युद्धात आतापर्यंत पाच लाख रशियन सैनिक ठार झाल्याचा दावा केला आहे. आधुनिक युगात केवळ भूभागासाठी लक्षावधी नागरिकांचा मृत्यू होण्याच्या घटनेचे वर्णन केवळ शब्दांनी करता येणार नाही. त्यात इराण-अमेरिका संघर्षाची भर पडली आहे. दुर्दैवाने या सर्व घडामोडींमध्ये संयुक्त राष्ट्र संघ दुर्बल आणि हताश झालेला आहे.

रशिया, इराण आणि अमेरिका या तीन हटवादी देशांनी जगाला वेठीस धरले आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा फटका केवळ बाल्कन आणि युरोपातील काही देशांनाच बसत आहे; पण इराण-अमेरिका संघर्षामुळे अवघे जग होरपळत आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याने युरोप, आफ्रिका खंड आणि आशियातील देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली आहे. या संघर्षाच्या केंद्रस्थानी इराण-अमेरिका-पाकिस्तान हे तिन्ही बेभरवशाचे आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे देश आहेत. एका आठवड्याच्या आत इराण शरण येईल, अशी वल्गना करणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्या तोंडाला आता फेस आला आहे. तीन महिने झाले असले तरी इराण हा देश बलाढ्य अमेरिकेसमोर पाय रोवून उभा आहे. विशेष म्हणजे इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा, अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प आणि संघर्षात मध्यस्थाच्या भूमिकेत असलेले पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर हे सारेच बेभरवशाचे नेते म्हणून पुढे आले आहेत. डोनाल्ड ट्रम्प दररोज विधाने बदलत आहेत. आज होणार, उद्या होणार म्हणून आज शंभर दिवस झाले तरी शांतता करार काही होण्याची चिन्हे नाहीत. ट्रम्प शांतता करार होणार-होणार असे दावे करतात; तर इराण या दाव्याचे खंडन करतो. तर दोन्ही देशांचा शांतता कराराचा मसुदा तयार आहे, लवकरच स्वाक्षरी होईल, असा दावा पाकिस्तान करीत असतो. आज या साऱ्या परिस्थितीचे अवलोकन केले असता अमेरिकेची जगात पुरती नाचक्की झाली आहे हेच खरे. अमेरिकेच्या अजेय लष्करी सामर्थ्याच्या प्रतिमेला तडा गेला आहे. अमेरिकन अध्यक्षाच्या विश्वासार्हतेपुढे प्रश्नचिन्ह लागले आहे. इराणचे भवितव्य मीच ठरविणार, अशा वल्गना करणाऱ्या ट्रम्प यांना इराणने पुरते कोंडीत पकडले आहे. अमेरिकेचे पश्चिम आशियातील लष्करी तळ नेस्तनाबूत झाल्याने अरब देशांना आता तथाकथित बलाढ्य देशावरील भरवसा उरलेला नाही. मोठी आर्थिक किंमत मोजून उभारलेले नागरी विमानतळ, इंधन आणि वायुसाठे, गॅस पाईपलाईन्स आदी पायाभूत सुविधांची नासधूस अरब देशांना डोळ्यादेखत पाहावी लागत आहे. सौदी अरेबिया, कतार, बहरीन, कुवैत हे देश संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून होते. पण, इराणच्या हल्ल्यांपासून अमेरिका आपल्याला वाचवू शकत नाही, याची जाणीव या अरब देशांना झाल्याने आता एक तर ते स्वतःचे सैन्य उभारतील किंवा इस्लामिक लष्करी गटाची निर्मिती करतील. सौदी अरेबियाने संरक्षणाची जबाबदारी पाकिस्तानकडे सोपविणे, हे या दिशेने पडलेले पाऊल आहे. अर्थात अमेरिकेची आतापर्यंतची लष्करी शक्ती म्हणजे झाकली मूठ सव्वा लाखाची होती, असेच म्हणावे लागेल. वर्तमान संघर्षांमुळे रशिया आणि अमेरिकेची पोलखोल झाली असून येणाऱ्या काळात जगातील भू-राजकीय समीकरणे पार बदलणार आहेत. अमेरिकेची दादागिरी आणि दबदबा डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या लहरी वर्तणुकीमुळे संपुष्टात आणला. केवळ विनाशकारी शस्त्रे भात्यात बाळगून युद्ध जिंकता येत नाही, तर ती वापरण्याचे काळीज आणि त्यानंतर होणारे परिणाम भोगण्याची हिंमतही असावी लागते. दोन जागतिक महाशक्तींच्या नांग्या ठेचल्या गेल्याने आता चीनलाही धडा मिळाला आहे. रविवारी किंवा सोमवारी इराणसोबत शांतता करार होईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. करार झाला तरी तो पूर्णपणे अमेरिकेच्या अटी-शर्तींवर होईल, असे होणार नाही. आगीत पोळलेले हात पूर्णपणे भाजू नयेत म्हणून ट्रम्प शांतता करार करण्यासाठी धडपडत आहेत. दुसरीकडे इराणकडे आता गमावण्यासारखे फारसे काही नाही. अमेरिकेची स्थिती जागतिक गुंडासारखी आहे. माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या काळात अमेरिकेला नको असलेला इराणसोबतचा अणुकरार झाला होता. ओबामा यांनी इराणसोबतच्या तणावाचे आणि संबंधाचे चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन केले होते. पण, एककल्ली, लहरी आणि गर्विष्ठ असलेले ट्रम्प यांना इराणला हाताळणे जमले नाही. वारंवार भूमिका बदलून त्यांनी स्वतःला जाळ्यात अडकवून घेतले. त्यांनी जगापुढे स्वतःच्याच देशाच्या लष्करी आणि रणनैतिक मर्यादा उघड्या पाडल्याच; शिवाय, यापुढे जागतिक रचनेत अमेरिकेचे स्थान काय असेल, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित व्हावे अशी स्थिती निर्माण केली. युक्रेनपुढे जसा रशिया उघडा पडला, तीच स्थिती इराणने अमेरिकेची केली आहे. या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी ट्रम्प धडपडत आहेत. त्यांचे परिणाम जगाला भोगावे लागत आहेत. अनेक देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली असून अर्थव्यवस्था डबघाईस आल्या आहेत. गेली साडेचार वर्षे इंधनाचे दर भारतात स्थिर होते. पण, पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने इंधनाचे दर वाढवावे लागले आहेत. सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. पश्चिम आशियातील संघर्ष लवकर संपुष्टात येण्यात जगाचे हित आहे. कधी ना कधी संघर्ष थांबेलच. तो दिवस लवकर यावा आणि महाशक्तींची मस्ती उतरवणारे संघर्ष अशी नोंद इतिहासात व्हावी एवढेच! ■

## दिल्ली दिनांक

# सरन्यायाधीशांचे वादग्रस्त विधान!

**रवींद्र दाणी**

''हे शिवा! तू आपला तिसरा डोळा उघडला तरी चालेल, पण जे चूक आहे त्याला मी चूकच म्हणेन.'' तीन दशकांपूर्वी बोफोर्स घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या अहवालातील पृष्ठ २३५ वरील हे विधान देशाच्या सरन्यायाधीशांनाही लागू पडावे असे आहे. त्या समितीवर विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला होता. पण, काँग्रेसचा मित्रपक्ष म्हणून अण्णा द्रमुक समितीत सामील झाला. नंतर हा मित्रपक्ष 'शत्रुपक्ष' झाला आणि या पक्षाचे समितीतील सदस्य डॉ. अलादी अरुणा यांनी मुख्य अहवालासोबत आपला वेगळा अहवाल जोडला. त्यात त्यांनी २००० वर्षांपूर्वीचे तामील कवी नरीक्कर यांचा एका कवितेचा दाखला घेत हे विधान केले होते.

**१५ मे ची घटना :** सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत यांनी १५ मे रोजी एका वेगळ्या संदर्भात, झुरळ, परजीवी ही टिप्पणी केली होती. एका वकिलाने सर्वोच्च न्यायालयात आपल्याला 'वरिष्ठ अधिवक्ता' म्हणून मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न चालविले होते. त्याला फटकारताना सरन्यायाधीश म्हणाले होते, ''काही लोक न्यायपालिकेबाबत लांछनास्पद टिप्पणी करीत असतात. यात काही झुरळासारेख युवाही आहेत, परजीवी आहेत, ज्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यांना या वकीलवर्गात काही मानही नसतो. त्यांच्यापैकी काही जण मग मीडिया, सोशल मीडिया चालवू लागतात. काही जण आरटीआय कार्यकर्ते होतात. काही जण अन्य प्रकारचे कार्यकर्ते होतात आणि मग ते सर्वांवर हल्ले चढवू लागतात.'' सरन्यायाधीशांच्या या विधानाचा संदर्भ फक्त मर्यादित होता. त्यांनी काही वकिलांबाबत झुरळ, परजीवी असे भाष्य केले होते. पण, प्रसारमाध्यमांनी नेमका तो भाग उचलला व वाद सुरू झाला.

झुरळाचा वाद सुरू झाल्यावर सरन्यायाधीशांनी लगेच स्पष्टीकरण केले. पण, तोपर्यंत त्यांच्या विधानाचा जो विपर्यास व्हायचा तो होऊन गेला होता.

**बुलेट फॉर बुलेट :** पोलिस दळात 'बुलेट फॉर बुलेट' ही घोषणा की शब्द लोकप्रिय ठरला आहे. याचा जन्म झाला होता पंजाबमध्ये दहशतवाद सुरू असताना. पंजाबचे तत्कालीन महासंचालक जे. एफ. रिबेरो यांच्या तोंडी हे शब्द घालण्यात आले होते. पण, रिबेरो यांनी कधीच 'बुलेट फॉर बुलेट'ची भाषा उच्चारली नव्हती. मग ते शब्द रिबेरो यांच्या तोंडी कसे घालण्यात आले? स्वतः रिबेरो यांनीच एकदा याचा खुलासा केला होता. चंडीगढच्या 'द ट्रिब्युन' या वृत्तपत्रात लिहिलेल्या एका लेखात रिबेरो यांनी लिहिले होते, बुलेट फॉर बुलेट हे स्व. अरुण नेहरू यांचे अपत्य होते. तेव्हा अरुण नेहरू हे अंतर्गत सुरक्षा मंत्री होते. त्यांनी स्वतः नवी दिल्लीच्या हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्राला रिबेरो यांचे नाव घेत ही बातमी पुरविली होती. ती प्रसिद्ध झाल्यावर गदारोळ सुरू झाला. पण, ही बातमी सकारात्मक असल्याने रिबेरो यांना त्याचा फायदाच झाला होता. त्यांनी कधी त्याचे खंडन केले नाही.

**विधान गवई यांचे :** माजी सरन्यायाधीश गवई यांच्या काळातही त्यांच्या एका टिप्पणीने असेच वादळ उठविले होते. खजुराओच्या जावरी मंदिरातील भगवान विष्णूची प्रतिमा क्षतिग्रस्त झालेली आहे. या प्रतिमेच्या दुरुस्तीसाठी एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. यात दखल न देण्याची भूमिका गवई यांनी घेतली. त्यांची भूमिका योग्य होती. कारण कायद्यानुसार सर्वोच्च न्यायालयाला यात काही करता येणार नव्हते. पण, त्यावेळी त्यांनी केलेली मौखिक टिप्पणी वाद निर्माण करून गेली. 'यात सर्वोच्च न्यायालय पडणार नाही. तुम्ही भगवान विष्णूलाच यासंदर्भात काही तरी करण्यास सांगा. तुम्ही स्वतःला भगवान विष्णूचे भक्त समजता. मग तुम्हीच भगवान विष्णूंकडे जा व त्यांना काही तरी करण्यास सांगा' असे गवई बोलून गेले होते. मग यावर वाद सुरू झाला. शेवटी गवई यांनी स्पष्टीकरण देत त्यावर खुलासा केला. पण, ते प्रकरण त्यावरच थांबले. यावेळी मात्र सरन्यायाधीशांनी केलेल्या टिप्पणीतून एका आंदोलनाचा की पक्षाचा जन्म झाला. या पक्षाला दोन कोटींहून अधिक समर्थक मिळाले.

**लंडनमध्ये प्रतिक्रिया :** सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत लंडनमध्ये एका भाषणासाठी गेले असताना, तेथेही याची प्रतिक्रिया उमटली. हे योग्य झाले नाही. वास्तविक सरन्यायाधीशांचा हेतू युवकांचा- बेरोजगारांचा अपमान वगैरे करण्याचा नव्हता. पण, त्यांच्या विधानाचा तसा अर्थ लावण्यात आला.

**रावत यांचे विधान :** देशाचे पहिले सरसेनापती सीडीएस जनरल बिपीन रावत यांनी नागरिकत्व विधेयकावरून झालेल्या हिंसाचाराबाबत एक वादग्रस्त विधान केले होते. त्याविरोधात काहूर उठल्यानंतर लष्कराच्या मुख्यालयाने त्याबाबत स्पष्टीकरण केले होते. टाईम्स ऑफ इंडियाने 'नो, जनरल' या शीर्षकाने एक संपादकीय लिहीत सरसेनापतींनी राजकीय विधाने करू नयेत असे म्हटले होते.

**शब्द शब्द जपून ठेव :** कुणाला आवडो वा न आवडो सध्याचा काळ हा सोशल मीडियाचा झाला आहे. जगात सोशल मीडियाने धुमाकूळ घातला आहे. दूरचित्रवाणी वाहिन्या वा वृत्तपत्रे एका चौकटीत काम करतात. प्रसिद्ध पत्रकार एम. व्ही. कामत यांनी आपल्या एका पुस्तकात म्हटले आहे, 'एखादा पत्रकार किती आणि काय लिहितो यापेक्षा तो काय लिहीत नाही हेही महत्त्वाचे असते.' राजकीय नेते अनेकदा 'ऑफ द रेकॉर्ड' बोलत असतात. पण, ते सहसा कुणी प्रसिद्ध करीत नाहीत. हा एक अलिखित नियम असतो. पण, सोशल मीडियाला अशी कोणतीही चौकट नाही. कोणताही नियम नाही. त्यातून एक लहानसे विधान, वाक्य वा शब्द व्हायरल होतो आणि मग तो संबधितासाठी तापदायक ठरतो. न्या. गवई यांनी याचा अनुभव घेतला आहे आणि आता न्या. सूर्य कांत याचा अनुभव घेत आहेत. यापुढे न्यायाधीश-सरन्यायाधीशांना मौखिक टिप्पणी करताना अधिकच काळजी घ्यावी लागणार आहे. कारण, त्यांच्याकडून नंतर केल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणाला कोणताही अर्थ राहात नाही. न्यायाधीशांनी केलेल्या मौखिक टिप्पणीचा उल्लेख अनेकदा लेखी निवाड्यात नसतो. मग, मौखिक टिप्पणीचा संदर्भ काय ?

**संवेदनशील पद :** देशाच्या रिझर्व्ह बँकचे गव्हर्नर हे देशाचा परकीय चलनसाठा, व्याजदर, सोन्याचा साठा याचे मुख्य सरंक्षक असतात. त्यांच्या एका विधानाने देशाचा शेअर बाजार खाली वर होण्याची शक्यता असते. तसेच देशाच्या सरन्यायाधीशांचे आहे. ते देशाच्या राज्यघटनेचे, न्यायप्रणालीचे मुख्य सरंक्षक असतात. त्यांच्या एका विधानाने काय गदारोळ होऊ शकतो हे देशासमोर आहे. आता या कॉक्रोच जनता पार्टीचे काय होणार हे तर इतिहासच सांगेल. या साऱ्या प्रकरणाचा धडा म्हणजे यापुढे न्यायाधीशांना कोणतीही टिप्पणी करण्यापूर्वी फार काळजी घ्यावी लागणार आहे. कारण, नंतर केल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणाला अर्थ राहात नाही हे वारंवार सिद्ध झालेले आहे.

**...कोई अर्थ नहीं! :** बिहारचे प्रसिद्ध कवी रामधारीसिंह 'दिनकर' यांच्या एका कवितेत हीच बाब फार मार्मिकपणे सांगण्यात आली आहे. त्यांच्या एका कवितेचे शीर्षक आहे- 'रह जाता कोई अर्थ नहीं' या कवितेतील चार ओळी आहेत..

मन कटूवाणी से आहत हो, भीतर तक छलनी हो जाये,
फिर बाद कहे प्रिय वचनों का, रह जाता कोई अर्थ नहीं
रह जाता कोई अर्थ नही ! ■

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# श्रमाला प्रतिष्ठा द्या शेतमजूर मिळवा!

शेती करणे आज कठीण झाले आहे. याची अनेक कारणे असली तरी महत्त्वाचा मुद्दा शेतमजुरांचा आहे. पैसा देऊनही शेतमजूर मिळत नसल्याने शेतकरी शेती करणेच सोडून देत आहेत. या परिस्थितीत समजा शेतमजुरांना समाजासह शासनाकडून प्रतिष्ठा मिळाल्यास ते पुन्हा शेताकडे वळतील. कारण प्रत्येकाला पैशांसह मानसन्मान हवा असतो. शेतमजुरांना पैसा सोडा प्रतिष्ठाही मिळत नाही. शिवाय अंत्योदय योजनेमार्फत ८० कोटी कुटुंबांना मोफत धान्य मिळत असल्याने त्यांची काम करण्याची इच्छाच संपुष्टात आली आहे. हा प्रकार असाच सुरू राहिल्यास भविष्यात आपली लोकसंख्या २०० कोटी राहील पण शेतमजूर आपल्याला परदेशातून आयात करावे लागतील.

हाताला काम नाही म्हणून खेडे बकाल झाले आहेत. रोजगारासाठी युवक-युवतींचे शहराकडे पलायन सुरू आहे. तर तिकडे शेतात शेतमजूर मिळत नसल्याने शेतकरी रडत आहेत. हा विरोधाभास सुरू राहिल्यास शेती कशी पिकणार, याचा विचार करावाच लागेल. संपूर्ण देशात विकसित भारत रोजगार आणि आजीविका मिशन सुरू आहे. त्याअनुषंगाने एका वर्षात १२५ दिवस रोजगार देण्याची हमी यामाध्यमाने दिली आहे. पण सरकारने हमी दिली, मात्र काम करणारे त्याकरिता तयार नाहीत. आराम हराम आहे. हे शाश्वत सत्य माहीत असूनही ग्रामीण भागात शेतीत रोजगार हाती असतानाही बेरोजगारांची फौज पानटपरीवर टाईमपास करताना दिसते. हा प्रकार चिंताजनक आहे.



तेव्हा सरकारने श्रमाला प्रतिष्ठा मिळेल, अशा स्वरूपाची संकल्पना प्रत्यक्षात आणायला हवी. रोजगार हमी योजनेच्या माध्यमाने नाल्या खोदणे, रस्त्याचे बांधकाम करणे सोडून आता त्यांना सरसकट शेतीच्या कामात लावायला हवे. शेतकरी जगला तरच देशातील जनता पोटभर भोजन करेल. अन्यथा लोकांना उपाशी राहावे लागेल. शेतमजूर मिळत नसल्याचे कारण अंत्योदय योजना सांगितले जाते. पण ते एक छोटेसे कारण आहे. त्यापेक्षा मोठे कारण शेतमजुरांना ती प्रतिष्ठाच मिळालेली नाही. सरकारी अधिकारी, डॉक्टर, इंजिनीअर, वकील, तहसील कार्यालयातील साध्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यालाही समाजाने प्रतिष्ठा दिलेली आहे. ती प्रतिष्ठा शेतमजुरांना दिलीच नाही. मजूर म्हणताच १०० पैकी ९९ लोक नाक मुरडून त्यांच्याकडे तुच्छतेने पाहतात. मग कसे वाढणार शेतमजूर, यावर कधीतरी चिंतन केले आहे का? आपण चापलुसी करून श्रेय लाटणाऱ्या शोभाराम सुगंधींना प्रतिष्ठा दिली, पण शरीराने मेहनत करणाऱ्यांना मानसन्मान देणे टाळले. त्यांना तुच्छ वागणूक दिली. आज शेतमजूर न मिळण्याचे तेच कारण आहे. क्रिकेटमध्ये पैसा आणि प्रतिष्ठा आहे. म्हणूनच कोट्यवधी मुले-मुली जीवाचे रान करतात. डॉक्टर, इंजिनीअर होणे प्रतिष्ठेसह पैसा कमावण्याचे माध्यम आहे. म्हणूनच त्याकरिता जीवाचा आटापिटा केला जातो. तशी मेहनत शेतमजूर बनण्यासाठी का नाही? कारण त्यात पैसा, प्रतिष्ठा आणि सुरक्षाही नाही. शेतमजूर होणे कुठल्याही येड्याचे काम नाही. त्यातही कसब लागतात. त्यातही शारीरिक व मानसिक शक्तीची कसोटी लागते. त्यात ऊन, वारा, पाऊस झेलण्याची ताकद हवी असते. वीज कडाडत असताना शेतात राबावे लागते. साप, विंचू, वन्यप्राण्यांची भीती झुगारून देशवासीयांसाठी घाम गाळावा लागतो. जेव्हा शेतमजूर घाम गाळतो तेव्हाच धान्यरूपी सोनं पिकते. म्हणूनच आता समाजाने त्यांना लोकाश्रय द्यावा अन् सरकारने राजाश्रय देत शेतमजूर म्हणवून घेणे गौरवपूर्ण ठरेल. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली तरच शेतमजुरांची फौज वाढेल. गावखेड्यात पूर्वी गुराखी राहायचे. ते आता नामशेष झाले. परिणामी गाईंची कत्तलखान्याकडे वाटचाल वाढली. शेतीपूरक व्यवसाय संपुष्टात आला. शेणखत मिळणेही कठीण झाले. समजा गुराख्यांना श्रमप्रतिष्ठा समाजाने दिली असती तर लाखों गाईंचे प्राण वाचले असते. भरपूर दूध मिळत राहिल्याने भेसळ करण्याची गरज भासली नसती. पण समाजच चुकला अन् सर्व जण गोत्यात आले. या चक्रव्यूहातून बाहेर पडायचे असेल तर श्रमाला प्रतिष्ठेसह प्रतिष्ठा द्यावी लागेल. अर्थात 'तुमचा पैसा आमचे श्रम। तुमची बुद्धी आमुचा उद्यम। एकाचा घोडा एकाचा सरंजाम। असावा जैसा ।। मुळीं जीवनाची तैसीच रचना। एकास हात लागती नाना। सर्वां मिळोनीच हा आपुल्या स्थानां। बनतो सन्मान घ्यावया ।।' हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचारच तारतील. ■

९८८१७१७८५९

## कानोसा

# तेल संकटाला भारतीय उत्तर

**अमोल पुसदकर**

जगाच्या अर्थकारणावर आणि राजकारणावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या घटकांपैकी एक म्हणजे खनिज तेल. जगातील बहुतांश देशांची वाहतूक व्यवस्था, उद्योग, वीज निर्मिती आणि संरक्षण व्यवस्था आजही मोठ्या प्रमाणात तेलावर अवलंबून आहे. त्यामुळे इराण-अमेरिका युद्धाने निर्माण झालेल्या पुरवठा साखळीतील अडथळ्यांचा थेट परिणाम तेलाच्या किमतींवर होतो आणि त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल आयातदार देश असल्यामुळे अशा संकटांचा फटका आपल्यालाही बसतो. या पृष्ठभूमीवर भारतासाठी 'ऊर्जा स्वावलंबन' हा केवळ आर्थिक विषय नसून राष्ट्रीय सुरक्षेचा आणि विकासाचा विषय आहे.

भारताला निसर्गाने सूर्यप्रकाशाचे अमूल्य वरदान दिले आहे. वर्षातील बहुतांश दिवस देशाच्या विविध भागांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. त्यामुळे सौर ऊर्जा हे भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाचे सर्वांत प्रभावी साधन ठरू शकते. आज मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जात असले तरी त्याची व्याप्ती आणखी वाढविण्याची गरज आहे. घरांच्या छतांवर सौर उपकरण, औद्योगिक क्षेत्रांमध्ये सौर ऊर्जा वापर, शासकीय इमारतींवरील सौर प्रकल्प आणि ग्रामीण भागातील सौर पंप या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होऊ शकते. भारतात लाखो हेक्टर जमीन पडीत अवस्थेत आहे. काही ठिकाणी सिंचनाच्या अभावामुळे तर काही ठिकाणी जमिनीची उत्पादकता कमी असल्यामुळे शेती करणे अवघड जाते. अशा जमिनींवर मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्प उभारता येऊ शकतात. यामुळे शेतकऱ्यांना जमीन भाड्याने देऊन नियमित उत्पन्न मिळू शकते. आज महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, हरयाणा, गुजरात या राज्यांमध्ये शेतकरी त्यांच्या जमिनीवर सौर प्रकल्प उभारून व त्यात निर्माण झालेल्या विजेला वीज वितरण कंपनीला विकून अधिक उत्पन्न मिळवत आहेत. पीएम कुसुम या योजनेअंतर्गत शेतीमध्ये सिंचन व्यवस्था उभी करण्यासाठी डिझेल पंपांच्या ऐवजी सौर ऊर्जेवर चालणारे पंप बसविणे व याचबरोबर विजेवर चालणाऱ्या पंपांना सौर ऊर्जेशी जोडण्याचे काम सुद्धा अनेक ठिकाणी झालेले आहे. सूर्य ऊर्जा आणि उत्पन्न दोन्हीही देत आहे.



ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे जैवइंधनाचा वापर. भारतामध्ये ऊस, मका, ज्वारी, बाजरी तसेच विविध तेलबिया पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. यापासून इथेनॉल आणि बायोडिझेलसारखी जैवइंधने तयार करता येतात. विशेष म्हणजे जैवइंधनासाठी लागणारी सर्व पिके सुपीक जमिनीवरच घ्यावी लागतात असे नाही. करंज, मोह, रतनजोत यांसारखी झाडे कोरडवाहू आणि कमी सुपीक जमिनीवरही वाढू शकतात. या वनस्पतींपासून बायोडिझेल तयार करता येते. विदेशातून तेल खरेदी करण्यासाठी खर्च होणारे परकीय चलन वाचविणे हे अत्यंत आवश्यक आणि काळाची गरज होऊन बसलेले आहे. जैवइंधनाचे पेट्रोल आणि डिझेलसारख्या पारंपरिक इंधनामध्ये मिश्रण मिश्रण केल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी ऑटोमोबाईल कंपन्या, तेल कंपन्या ,भारतीय तंत्रज्ञान संस्था व आचार्य पदवी मिळविण्यासाठी शोध करणारे विद्यार्थी या सर्वांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे.

जैवइंधनामुळे दोन महत्त्वाचे फायदे होतात. पहिला म्हणजे पेट्रोल आणि डिझेलवरील आयातीचे अवलंबित्व कमी होते. दुसरा म्हणजे शेतकऱ्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत उपलब्ध होतो. आज अनेक भागांमध्ये पडीत पडलेल्या जमिनींचा उपयोग जैवइंधनासाठी होणाऱ्या पिकांच्या लागवडीसाठी केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळू शकते. देशातील साखर कारखाने आणि इथेनॉल निर्मिती उद्योग यांच्यामध्ये सुसंगत धोरण तयार केल्यास शेतकऱ्यांची समृद्धी आणि देशाचे ऊर्जा स्वावलंबन हे दोन्ही उद्दिष्ट साध्य होऊ शकतात.

आज वाहतूक क्षेत्रातही मोठे परिवर्तन घडत आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत आहे. पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमुळे इंधन आयात वाढते तसेच प्रदूषणही होते. त्याउलट इलेक्ट्रिक वाहने देशात निर्माण होणाऱ्या विजेवर चालू शकतात. जर ही वीज सौर किंवा पवन ऊर्जेतून निर्माण केली गेली तर इंधन खर्च आणि प्रदूषण दोन्ही कमी होईल. भारतात इलेक्ट्रिक दुचाकी, तीनचाकी आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांचा विस्तार केल्यास इंधन आयातीत मोठी बचत होऊ शकते. इलेक्ट्रिक किंवा साधी सायकल ही सुद्धा इंधनाची बचत करू शकते व आरोग्य सुद्धा सुधारू शकते. अनेक मोठमोठ्या कंपन्यांमध्ये व सरकारी कार्यालयांमध्ये सुद्धा त्यांचा परिसर खूप मोठा असल्यामुळे परिसरात फिरण्यासाठी सायकलचा वापर केल्यास हरित जीवन पद्धतीचा अवलंब सुद्धा होऊ शकतो.

ऊर्जा क्षेत्रातील आणखी एक क्रांतिकारी संकल्पना म्हणजे हरित हायड्रोजन. हायड्रोजन हे अत्यंत स्वच्छ इंधन मानले जाते. त्याच्या वापरामुळे कार्बन डायऑक्साईडऐवजी मुख्यतः पाण्याची वाफ निर्माण होते. हरित हायड्रोजन तयार करण्यासाठी पाण्याचे विद्युत अपघटन केले जाते. या प्रक्रियेसाठी आवश्यक वीज जर सौर किंवा पवन ऊर्जेतून मिळाली तर तयार होणारा हायड्रोजन पूर्णपणे पर्यावरणपूरक ठरतो.

भारतामध्ये हरित हायड्रोजन निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश आणि वाऱ्याची उपलब्धता आहे. येथे मोठ्या प्रमाणात सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प उभारून त्याद्वारे हरित हायड्रोजनचे उत्पादन करता येऊ शकते. भविष्यात हे इंधन ट्रक, बस, रेल्वे, जहाजे तसेच पोलाद, रसायन आणि खत उद्योगांमध्ये वापरले जाऊ शकते. ऊर्जा स्वावलंबनाचा मार्ग केवळ सरकारच्या धोरणांमधूनच तयार होणार नाही. त्यासाठी उद्योग, शेतकरी, संशोधन संस्था आणि सामान्य नागरिक यांचेही योगदान आवश्यक आहे. आज भारतासमोर एक ऐतिहासिक संधी उभी आहे. सूर्यप्रकाश, विशाल भूभाग, कृषी संसाधने आणि युवा मनुष्यबळ या सर्वांचा योग्य वापर केल्यास भारत ऊर्जा आयात करणारा देश न राहता ऊर्जा क्षेत्रातील महासत्ता बनू शकतो. ऊर्जा स्वावलंबन हा केवळ विकासाचा मार्ग नाही, तर तो आर्थिक स्थैर्य, पर्यावरण संरक्षण, शेतकरी समृद्धी आणि राष्ट्रीय सुरक्षेची हमी देणारा मार्ग आहे. सरकार त्या दिशेने जात आहे. ■

९५५२५३५८१३ (लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### नाग नदीतील सांडपाण्यामुळे गोसीखुर्द प्रदूषित

वरील मथळ्याची बातमी १२ जून २०२६ घ्या तरुण भारतात वाचण्यात आली. भंडारा जिल्ह्याच्या पवनी तहसीलमध्ये वैनगंगा नदीवर गोसीखुर्द धरण बांधण्यात आले आहे. या धरणाच्या पाणीसाठ्यात नाग नदीतील सांडपाणी मिसळून या धरणाचा पाणीसाठा प्रदूषित होत आहे. कारण नाग नदी कन्हान नदीला मिळते व कन्हान नदी वैनगंगा नदीला मिळते. गोसीखुर्द हा विदर्भातील एक मोठा सिंचन प्रकल्प असून तो पूर्णत्वास आला आहे. गोसीखुर्द प्रकल्पाची सुधारित अंदाजे किंमत १८००० कोटी रुपये झाली आहे. अशा परिस्थितीत नाग नदीतील सांडपाणी शुद्धीकरणाचा अपेक्षित खर्च अत्यल्प आहे. सबब नाग नदीतील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे, तसेच गोसीखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यातील जलपर्णी काढणे आवश्यक आहे, जेणेकरून गोसीखुर्द धरणाचा पाणीसाठा शुद्ध होऊन पर्यावरण व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चांगले होईल. या प्रकरणी उच्च न्यायालयाने दखल घेतली असल्याने नाग नदी शुद्धीकरणाचे काम तातडीने पूर्ण व्हावे. असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

* * *

### 'मृत्यूच्या पार्ट्या' थांबणार कधी ?

वरळी येथील एका भव्य म्युझिक कॉन्सर्टमध्ये एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पुन्हा एकदा समाजाला अस्वस्थ करून गेली. यापूर्वी गोव्यातील 'सनबर्न फेस्टिव्हल'मध्ये असे दुर्दैवी प्रसंग घडले आहेत. संगीत, मनोरंजन आणि आधुनिकतेच्या नावाखाली आयोजित होणारे असे कार्यक्रम अनेकदा तरुणांना चुकीच्या मार्गाकडे घेऊन जाणारे ठरतात. काही तासांच्या क्षणिक आनंदासाठी स्वतःचे आरोग्य, भविष्य आणि कधीकधी जीवनही पणाला लावले जात असल्याचे त्यांच्या लक्षातही येत नाही. युवकांचे जीवन सुरक्षित ठेवणे आणि त्यांना व्यसनांच्या गर्तेत जाण्यापासून रोखणे ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाज आणि प्रशासनाचीही सामूहिक जबाबदारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या संस्कारभूमीत तरुण पिढीला व्यसनांच्या अंधाराकडे ढकलणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटनांमुळे अनेक कुटुंबांची स्वप्ने उद्ध्वस्त होत राहतील. मनोरंजनाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे असले, तरी ते समाजहित आणि तरुणांच्या सुरक्षिततेच्या किमतीवर असू नये, हीच या घटनेतून मिळणारी सर्वांत मोठी शिकवण आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

* * *

### जयशंकर यांची स्पष्टोक्ती

'आम्ही कधीच युरोपसाठी धोका ठरलो नाही : जयशंकर' ही बातमी वाचली. एका हिंदी चित्रपटात एक संवाद आहे. त्यातील नायक म्हणतो, 'भगवान की बनायी हुई यह दुनिया एक ऐसा बाजार है जहाँ इन्सान के कर्मों का हिसाब उसे इसी जनम में चुकता करना पडता है!' हा संवाद आठवण्याचे कारण म्हणजे युरोपातील बहुतेक सर्वच देश इस्लामी दहशतवादाच्या जाळ्यात अडकले आहेत. मात्र सुंभ जळला तरीही पीळ जळला नाही म्हणतात त्याप्रमाणे भारतात दहशतवाद पसरवणार्या देशांना आजही ते शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

ज्या इंग्लंडने भारतावर दीडशे वर्षे राज्य केले ते त्यांच्या फोडा आणि झोडा तत्त्वाने, तोच देश आज इस्लामी दहशतवादात पोळतो आहे! आज त्यांना अहिंसेचे आणि मानवतावादाचे स्मरण झाले आहे. मानवतावादाची शिकवण युरोपीय देशांकडून शिकण्याची वेळ भारतावर अजून आलेली नाही असेही या चर्चेदरम्यान परराष्ट्र मंत्र्यांनी सुनावले आहे. भारत हा वसुधैव कुटुंबकम् अर्थात हे विश्वचि माझे घर, माझे कुटुंब, या तत्त्वावर वाटचाल करत आहे. आधी शेकडो वर्षे मुघलांचे, नंतर दीडशे वर्षे ब्रिटिशांचे अनन्वित अत्याचार सहन करूनही आणि स्वातंत्र्यापासून आजतागायत दहशतवादाचे हजारो बळी जाऊनही भारताने शांततेची कास सोडली नाही. मात्र काँग्रेसच्या कारकीर्दीत कधीही नव्हते असे राष्ट्र सर्वोपरी हे धोरण २०१४ पासून मोदी सरकार कर्तव्यकठोरपणे पाळत आहे. रशियाकडून तेल घ्यायच्या मुद्यावरही परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेत जाऊन ट्रम्प सरकारला सुनावले होते. तेल विकणारा रशिया, पैसे देऊन तेल घेणारा भारत, मग अमेरिका कोण, अमेरिकेचा काय संबंध? असा प्रश्न त्यांनी रोखठोकपणे विचारला होता. आजतागायत काँग्रेसच्या कोणत्याही पंतप्रधानांनी किंवा मंत्र्यांनी एवढे धाडस दाखवल्याचे ऐकिवात किंवा वाचनात आले नाही. काही महिन्यांपूर्वी एका भारतीय वृत्तवाहिनीवर काही पाकिस्तानी नेते आणि पत्रकार चर्चेसाठी आले होते. तेव्हा निवेदकाने त्यांना एक प्रश्न विचारला होता. तो असा, पाकिस्तानमधील परिस्थिती सुधारण्यासाठी तुम्ही काय करणार? तेव्हा बहुतेक सर्व पाकिस्तानी नेते आणि पत्रकारांनी सांगितले की, आम्हाला पाच वर्षांसाठी पाकिस्तान सरकार चालवायला, भारतातील फक्त दोनच लोकांची आवश्यकता आहे. एक म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरे म्हणजे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर! तसे झाले तर, पाकिस्तान दहशतवादमुक्त होईल, पाकिस्तानी सुतासारखे सरळ होतील. ■

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नीट पेपरफुटी प्रकरणी २० जूनला आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि .१५ जून : देशभरात गाजलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचे तीव्र पडसाद आता लातूरमध्ये उमटणार आहेत .

लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या या गैरव्यवहाराचा निषेध करण्यासाठी२० जून रोजी गांधी चौकात आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे .

कॉक्रोज जनना पार्टीसह विविध राजकीय पक्ष, विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संस्थांनी य आंदोलनाची हाक दिली आहे .

केंद्रीय शिक्षण मंत्री धमेंद्र प्रधान यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्कळ राजीनामा द्यावा . ही आंदोलनाची मुख्य मागणी आहे .

नीट परीक्षेमुळे मानसिक आणि आर्थिक फटका बसलेल्या पीडित विद्यार्थर्यांना सरकारने प्रत्येकी१०000/ रुपये भरपाई द्यावी . पेपर फुटीच्या नैराश्यातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुबियांना प्रत्येको२५ लाख रुपयांची मदत जाहीर करावी . देशभरातून विद्यार्थर्यांच्या तीव्र विरोध होत असताना ही शिक्षण मंत्री पदावर कायम असल्याबद्दल आयोजकांनी तीव्र संताप व्यस्त केला आहे .

हे आंदोलन२० जून रोजी सकाळी गांधी चौक येथे सुरू होणार असून यात नागरिकांनी सहभावी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे .



# विविध वृत्त...

## उद्या शहरात रिक्षा बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१५ जून : शहरातील एका ऑटो रिक्षा चालकास वाहतूक पोलिसांकडून नुकतीच मारहाणीची घटना घडली असल्यामुळे शहरातील रिक्षा चालक संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली आहे .

या घटनेच्य निषेध म्हणून लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या परिवहन विभागाच्या वतीने१७ जून . बुधवारी ऑटो रिक्षा बंद, आंदोलनाची घोषणा केली आहे.

या आंदोलना चा मोठा फटका सर्वसामान्य प्रवाशां बसण्याची शक्यता असून त्यांची गैरसोय होणार आहे.

काही दिवसांपूर्वी शहरातील मिनी मार्केट परिसरांमध्ये एका वाहतूक पोलीसाने रस्यांवरून जात असलेल्या मोटार सायकलच्या पुढे जाऊन वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला होता . त्यावेळी मोटार सायकल चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून तो दुभाजकाला धडक ला होता . याप्रकरणी वाहतूक पोलीसावर कारवाई करण्यात आली होती.

## लातूर जिल्ह्यातील राजकुमार मारोती पन्हाळे पुरस्काराने सन्मानित



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील उमरगा, जळकोट तालुक्यातील सरपंच राजकुमार मारोती पन्हाळे यांना सोयाबीन लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाधन योद्धा पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.या पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो.कार्यक्रमात बोलताना पुरस्कार विजेते राजकुमार मारोती पन्हाळे यांनी आपले मत मांडले.

## लातूर जिल्ह्यात पावसाचा खंड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर जिल्हयात गेल्या कांही दिवसापासून पावसाचा खंड पडला आहे. सुरूवातीला झालेल्या पावसामुळे कांही शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू केल्या आहेत. मात्र कृषि विभागाने जमिनीची चांगली ओल झाल्याशिवाय पेरणी करू नये, असे आवाहन केले आहे. गेल्या आठ दिवसापासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. हवामान विभागाकडून पावसाचे लवकरच आगमन होईल असे संकेत देण्यात येत आहेत. जिल्हयात अद्याप दमदार पाऊस झाला नाही. शेतकरी पावसाकडे डोळे लावून बसले आहेत. पाऊस पडल्यानंतर पेरणीला सुरूवात होणार आहे.

## जूना औसा रोडवर विजेचा लपंडाव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : शहरातील जुना औसा रोड परिसरातील सद्गुरुनगर आणि आसपासच्या भागात गेल्या काहीँ दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीज प्रवाहाच्या लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. काही निवडक भागातच दररोज वीजपुरवठा खंडित होत असून उर्वरीत परिसरात वीज पुरवठा सुरळीत सुरु राहात असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. रोजच रात्री अचानक वीज जाणे, तासनतास अंधारात राहावे लागणे आणि त्याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती न मिळणे यामुळे नागरिकांचा संयम संपत चालला आहे. त्यामुळे महावितरणने या बाबींची दखल घेवून या भागात वीज पुरवठा सुरळीत करवा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# काटगाव येथे 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात जिल्हाधिकारी बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवात रूपांतरित करणे, या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा 'शाळा प्रवेशोत्सव'चा लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, प्राथमिकच्या उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी, लातूरचे गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. याच पार्श्र्वभूमीवर काटगाव येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन अत्यंत आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेचे पर्यावरण अधिक समृद्ध आणि हिरवेगार व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, हा यामागील उद्देश होता. शाळेतील विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपण करून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने राज्यभर हा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना देण्याची 'पहिले पाऊल' ही अभिनव संकल्पनाही राबविली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात काटगाव येथील शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री. मांदळे, केंद्रप्रमुख वामन राठोड, शिक्षक विजय माळाळे, गोविंद गारकर आणि श्रीमती राजमाले, श्रीमती तांदळे, श्रीमती खंडागळे, श्रीमती लांडगे, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती सय्यद उपस्थित होत्या.

### विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी

आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देवून त्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देवून या अनुषंगाने शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

## जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा निवड चाचणी स्पर्धांचे उद्‌घाटन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : जिल्हा बॅडमिंटन संघटनेमार्फत स्व. राजगोपाल भार्गव यांच्या स्मृतीपित्यर्थ दरवर्षीप्रमाणे यावर्षी जिल्हा आजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. त्याचा उद्घाटन समारंभ दि. १३ जुन रोजी दयानंद बॅडमिंटन संकुलात जेष्ठ चिकित्सक डॉ. पी. आर. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष बाबुराव वाघमारे, उपाध्यक्ष एन.एस. रेड्डी, उपाध्यक्ष आनंद लाहोटी, कोषाध्यक्ष मनिष राठी, सहसचिव रविंद्र शेट्टी, कार्यकारणी सदस्य कमलकिशोर अग्रवाल, आंतरराष्ट्रीय खेळाडु व प्रशिक्षक अक्षय राऊत तसेच लातूर जिल्ह्यातील बॅडमिंटन खेळाडु आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

या उद्घाटन प्रसंगी डॉ. देशमुख म्हणाले, ५० वर्षापुर्वी लातूर शहरामध्ये असलेल्या बॅडमिंटनच्या सुविधा व खेळाडुंची संख्या व आज लातूर शहरात झालेले ३५ ते ४० बॅडमिंटन संकुल. आणि आज जगभर प्रसिध्द असलेल्या बॅडमिटन खेळाचा झालेला प्रचार व प्रसार याचे

तुलनात्मक विश्र्लेषण केले.

या प्रसंगी जिल्हा संघटनेची ५० वर्षाची वाटचाल ही येणाऱ्या वर्षामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणुन निरनिराळे प्रकल्प बॅडमिंटनचा विकास करण्यासाठी घेतले जाणार असल्याचे सचिव ॲड. आशिष बाजपाई यांनी प्रस्तावनेमध्ये सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आशिष सोमाणी यांनी केले.

## स्व. डॉ. नारायणराव चाटे यांचा समर्थ वारसा धनंजय चाटे चालवत आहेत : ना. बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १५ जून : चापोली येथील नवयुवक शिक्षण संस्थेने सर्व क्षेत्रात प्रगती केली असून स्व. डॉ. नारायणराव दौलतराव चाटे यांचा समर्थ वारसा प्राचार्य धनंजय चाटे चालवत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले.चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात आयोजित माजी बांधकाम व आरोग्य सभापती दिवंगत नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी, गुणवंत खेळाडू, यांचा सत्कार व नेत्र तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष आ . विक्रम काळे होते.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील,संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य धनंजय चाटे,डॉक्टर भालचंद्र चाटे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, प्रफुल्लचंद्र गुंडरे, चाकूर पंचायत समितीचे उपसभापती भुजंग शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, सिद्धेश्र्वर अंकलकोटे , मधुकर मुंडे,रामचंद्र तिरुके, सचिन केंद्रे जिल्हा परिषद सदस्य माळहिप्परगा, अनिल वाडकर, देविदास माने, विष्णू तीकटे, डॉक्टर नरेंद्र हाके, प्रतीक केदार, मन्मथ शेटकर, महताब मोमीन, फारूकमिया देशमुख, रामेश्र्वर होनराव, प्रभाकर होनराव, बळीराम भोसले, नाथा मद्रेवार, विश्र्वनाथ पाटील, नारायण काचे, माधव कांबळे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की लोकनेते स्वर्गवासी डॉक्टर नारायणराव चाटे यांचे कार्य हे अत्यंत चांगले होते . त्यांचे कार्य चालवण्याचं काम डॉक्टर धनंजय चाटे व चाटे परिवार करत आहे. यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान व नेत्र शिबिर व हेल्मेट वाटपचा कार्यक्रम अत्यंत कौतुकास्पद असून समाजाला त्याची आवश्यकता आहे असे सर्व उपक्रम धनंजय चाटे यांच्या वतीने घेण्यात येत आहेत. त्यांच्या सोबत व त्यांच्या संस्थेच्या सोबत आम्ही कायम असून एक लोकप्रतिनिधी म्हणून सर्वजण त्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही सुद्धा सहकार मंत्री नामदार पाटील यांनी या कार्यक्रमात दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांनी केले. तात्यांनी संजीवनी महाविद्यालयाचा धावता आढावा सादर केला.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक श्रीहरी वेदपाठक, संदीप मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार संस्थेचे सचिव तथा सरपंच डॉक्टर भालचंद्र चाटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजीवनी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक शिक्षकतेर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट
# मनपाच्या नवीन जॅकवेल कामाची पाहणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला असून, राज्य शासनाच्या आदेशानुसार धरणातील सर्व पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

'एल निनो'च्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच, धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यासाठी 'अमृत २.0' योजनेअंतर्गत मांजरा धरण परिसरात नवीन जॅकवेल उभारण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली.

या पाहणी दौऱ्यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

## जुगार अड्डयांवर पोलिस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी मटका-जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिति मिळाल्यावरून पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड येथून कारवाईसाठी पोलिस पथक पाठविले होते. सदर पथकाने निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील जुगार अड्डयांवर धाड टाकून २ लाख ४३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून कासार शिरसी येथे सचिन बारच्या बाजूला प्रभाकर माने यांच्या दुकानात छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना ९ इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून ३२ हजार ९१० रुपयांची रोकड, ६५ हजार ८०० रुपयांचे ९ मोबाईल, १ लाख ४५ हजार रुपयांच्या ४ मोटारसायकली, असा २ लाख ४३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांचेविरुध्द कासार शिरशी पोलीस ठाणे येथे गुरनं १३७/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कारवाईत, पोलिस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या कामगिरीबाबत पोलिस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# प्लास्टिकवर मनपाची कारवाई
## १० किलो प्लास्टिक जप्त; ९ हजार दंड वसूल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी यांचे निर्देशानुसार दि. १५ जून रोजी गंजगोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर कार्यवाही करण्यात आली. १० किलो प्लास्टिक जप्त करुन ९ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

सदर कार्यवाही दरम्यान ३ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून १० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आला असून ९ हजार ३०० रूपयांची दंडात्मक कार्यवाही

करण्यात आली. तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या दोन नागरिकांना दंड करण्यात आला.

सदर कार्यवाही दरम्यान प्रमुख स्वच्छता निरिक्षक अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक महादेव फिस्के, प्रदीप गायकवाड, रवि शेंडगे, श्रीकांत शिंदे, निलेश शिंदे, कर्मचारी उपस्थित

होते. ही मोहीम अशीच सुरू राहणार असून शहरातील व्यवसायीकांनी व नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकू नये, असे आवाहन उपायुक्त वसुधा फड यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत

## जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, लोकप्रतिनिधी, संस्थाचालकांनी प्रवेश उत्सवात घेतला सहभाग





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**

विदर्भ वगळता राज्यातील जिल्हा परिषद व खाजगी अनुदानीत, विनाअनुदानीत शाळांना आजपासून प्रारंभ झाला असून शाळेच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्यासह शहरी व ग्रामीण भागात राबविण्यात आलेल्या प्रचेश उत्सवात लोकप्रतिनिधी, संस्था चालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे.

विदर्भ वगळता राज्यातील शाळांना दि १५ जून सोमवारपासून सुरूवात झाली आहे. यानिमित्त शिक्षण मंत्रालयाकडून शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळांनी प्रवेश उत्सव साजरा करण्याचे तसेच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचे आवाहन शाळांना केले होते. या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच लोकप्रतिनिधींनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहनही करण्यात आले होते. त्याअनुषंगाने शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जोरदार तयारी केल्याचे शहरी व ग्रामीण भागात दिसून आले. शहरानजीक असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बळसोंड या शाळेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी प्रवेश उत्सवात सहभाग घेतला. शाळेच्या प्रांगणासह इतर परिसर रंगीबेरंगी फुगे, प्रवेश दिंडी तसेच रांगोळ्यांनी सजवण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड, गोडी तसेच सकारात्मक वातावरण निर्मितीसाठी प्रवेशोत्सव साजरा करण्यात येत असून शिक्षक, प्रतिष्ठित नागरिक तसेच पालकांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी गटशिक्षणाधिकारी दत्ता नांदे, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका तसेच विद्यार्थी-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात सकाळी सात वाजता शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन संस्थेचे उपाध्यक्ष ॲड केशवराव सिरसाट यांनी स्वागत केले. यावेळी रंगीबेरंगी फुग्यांनी शाळेला सजवण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे यांच्यासह शिक्षक, शिक्षीका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

दीर्घ सुट्ट्यांनंतर १५ जून रोजी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा पहिला दिवस हिंगोली शहरात मोठ्या उत्साहात आणि आनंदात सुरू झाला. शहरातील नामांकित जिल्हा परिषद बहुविध प्रशाला आणि जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे पहिल्याच दिवशी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि औक्षण करून अत्यंत भावपूर्ण व उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या या आदरतिथ्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला होता.





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आडगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. याप्रसंगी शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या नवोदित विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नव्याने प्रवेश घेणाऱ्या चिमुरड्या विद्यार्थ्यांना हार आणि पुष्पगुच्छ देऊन शाळेत स्वागत करण्यात आले. यासोबतच शासनाच्या वतीने देण्यात येणारे मोफत शालेय गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नवीन पुस्तके आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून येत होता.

भव्य ट्रॅक्टर दिंडीने वेधले गावकऱ्यांचे लक्ष

या प्रवेशोत्सवाचे मुख्य आकर्षण विद्यार्थ्यांची 'प्रवेशदिंडी' ठरली. ट्रॅक्टरला आकर्षक सजावट करून गावातील मुख्य रस्त्यांवरून ही भव्य दिंडी काढण्यात आली. यावेळी मुटकुळे यांच्या हस्ते रिबीन कापून या दिंडीचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. 'शाळा भरली, शाळा भरली' अशा घोषणा देत निघालेल्या या दिंडीने संपूर्ण गावाचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्याप्रसंगी भाजपचे विविध पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# चोंढी बु. येथील पाणी टंचाई दुर करण्याची ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**

सेनगाव तालुक्यातील चोंढी बु येथील ग्रामसेवक व सेवक यांच्या मनमानी कारभारामुळे विहीरीला पाणी असूनही गावात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. संबंधितांची चौकशी करून त्यांची बदली करण्यात यावी तसेच गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्याकडे केली आहे.



सेनगाव तालुक्यातील चोंढी बु. या गावात दोन विहीरी आहेत. विहीरीला पाणी आहे. विहीरीवर चार मोटारी बसविण्यात आल्या आहेत. या विहीरीमधून गावाला पाणीपुरवठा केल्या जातो. दर महिन्याला ग्रामस्थांकडून रूपये पाणीपट्टी वसूल केली जात आहे. परंतु गावाला तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. पाण्याची टाकी भरूनही गावाला पाणीपुरवठा केल्या जात नाही. ग्रामसेवक यांच्या आदेशाशिवाय ग्रामपंचायत सेवक पाणी सोडत नाही. दुसरीकडे ग्रामसेवक सेनगाव येथून गावाचा कारभार चालवित आहेत. गावातील लोकांना त्यामुळे तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. ग्रामस्थांनी संपर्क साधला असता त्यांना अरेरावीची भाषा केल्या जात आहे. संबंधित ग्रामसेवक व सेवक यांची चौकशी करून त्यांची बदली करण्यात यावी आणि गावाला सुरळीत पाणीपुरवठा करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निवेदनावर ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली- भाजपच्यावतीने सोमवारी प्रबुध्दजन संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी मार्गदर्शन केले. या संमेलनाला आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. डॉ प्रज्ञा सातव, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, महिला जिल्हाध्यक्ष उज्ज्वला तांभाळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## संक्षिप्त वृत्त

### आर्ट ऑफ लिवींगकडून स्वच्छता मोहीम



हिंगोली- आर्ट ऑफ लिव्हिंग चे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त दिनांक ०९.०६.२०२६ ते १४.०६.२०२६ पर्यंत ६ दिवसाचे आनंद अनुभुती शिबीर सह्याद्री हॉस्पिटल हिंगोली येथे घेण्यात आले. शिबिरात प्रशिक्षक नरेंद्र भैया, पजई सर, सुनीता दीदी यानी साधकांना मार्गदर्शन केले. सदरील शिबिरात सकाळ व सायंकाळची बॅच मिळून ४९ साधकांनी भाग घेतला. शिबिराचे शेवटच्या दिवशी शिबिराचा एक भाग म्हणुन हिंगोली येथील खटकाळी हनुमान मंदिर येथे सर्व साधकां कडून स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होणे करिता संपूर्ण आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार हिंगोली यांनी काम केले.

### पदवीधर मतदान नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन



हिंगोली- अकोला बायपास हिंगोली येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आ. तथा विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते मराठवाडा पदवीधर मतदार नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. मराठवाडा पदवीधर मतदार संघ समन्वयक दिलीप घुगे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाला उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये शाळा प्रवेशोत्सव

हिंगोली- राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत दि १५ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत रंगीबेरंगी फुग्यांची सजावट करण्यात आली होती. मुलांचे औक्षण करून आणि पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत झाला होता. शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक, शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक बल्लाळ, पर्यवेक्षक डोल्हारे, कान्हेड, सौ सोळंके, सौ पाईकराव, काळे, नायक, ठोके, टेकाळे, श्री चाटसे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी इमरान शेख, नरवाडे यांची उपस्थिती होती.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे नगर पालिकेच्या भूखंडाची रजिस्ट्री?

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १५ जून**

नगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांच्या व्यवहारांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे काही भूखंडांच्या रजिस्ट्री झाल्याचा आरोप समोर आला आहे. या प्रकरणात नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या व शिक्क्यांचा वापर झाल्याची तक्रार करण्यात आली असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

सर्व्हे क्रमांक १८० मधील काही भूखंडांच्या मालकी हक्कासंदर्भातील कागदपत्रांमध्ये विसंगती आढळून आल्याचे सांगितले जात आहे. संबंधित व्यवहारांसाठी वापरण्यात आलेल्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित करण्यात आली असून, त्यांची सत्यता तपासली जात आहे. या व्यवहारांमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

नगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर मुख्याधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पोलिसांकडेही तक्रार देण्यात आली असून तपास यंत्रणा विविध बाबींची छाननी करत आहे.

दरम्यान, नगररचना विभागाशी संबंधित एका अधिकाऱ्याच्या नावाने कथित बनावट स्वाक्षरी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यामुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले असून, बनावट कागदपत्रे तयार करून मालकी हक्क बदलण्याचा प्रयत्न झाला का? याचा तपास केला जात आहे.

या प्रकरणानंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. नगरपालिकेच्या मालकीच्या जागांबाबत यापूर्वी झालेल्या व्यवहारांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. काही जणांच्या संगनमतातून हे व्यवहार घडले का? तसेच यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का? याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

चौकशी अहवालाकडे सर्वांचे लक्ष

सध्या या प्रकरणातील सर्व कागदपत्रांची तपासणी सुरू असून, चौकशी अहवालानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. मात्र, नगरपालिकेच्या मालमत्तेशी संबंधित या प्रकरणामुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, तपासातून नेमके सत्य काय समोर येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धनगरवाडी येथील रस्ता खुला करून देण्याचे तहसीलदारांचे आदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथील गट क्रमांक २९६ व २९७ मधील रस्ता खुला करून देण्याची मागणी शेतकऱ्यांनी सेनगाव तहसीलदार यांचेकडे केली होती. या मागणीची दखल घेत तहसीलदारांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना हा रस्ता खुला करून देण्याचे आदेश दिले आहेत.

धनगरवाडी येथील गट क्रमांक २९६ व २९७ मधील रस्ता शेतकऱ्यांना जाण्यायेण्यासाठी खुला करून देण्यात यावा अशी मागणी तहसीलदार मांडवगडे यांचेकडे शेतकऱ्यांनी केली होती. या मागणीची दखल घेत तहसीलदार मांडवगडे यांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसुल अधिकारी यांना आदेश दिले आहेत. या रस्त्यावरील झाडे तोडण्याची परवानगी वन विभागाने दिली असून हा रस्ता शेतकऱ्यांसाठी खुला करून द्यावा जेणेकरून त्यांना या रस्त्यावरून शेतात जाणे आणि शेतीचे कामे करणे सोपे होणार आहे. हा रस्ता खुला न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ पुरूष आणि महिला यांची उपस्थिती होती.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा १२ वर्षाचा कालखंड देशाचे सुवर्णयुग- दानवे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पूर्ण केलेली १२ वर्षे ही केवळ सत्ता चालवण्याची नसून देशाच्या गौरवाची, गरीब कल्याणाची आणि ऐतिहासिक विकासाची आहेत. त्यांच्या कार्यकाळात भारताने प्रत्येक क्षेत्रात मारलेली भरारी अभूतपूर्व असून, हा कालखंड देशाच्या सुवर्णयुगाचा काळ ठरला आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित १२ वर्षे विश्वासाचे, विकासाचे आणि जनकल्याणाचे या अभियानांतर्गत हिंगोली येथे भव्य प्रबुद्धजन संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर आमदार तान्हाजीराव मुटकूळे, आमदार डॉ.प्रज्ञाताई सातव, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, महिला जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांभाळे, के.के.शिंदे, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकूळे, सुभाष लदनिया, युवानेते शशिकांत वडकुते, सुरजितसिंह ठाकुर, जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे, सुनिताताई मुळे, सुनिल देवडा, ॲड. श्रीधर घुगे, ॲड.सुनिल भुक्तर, ॲड.राजेश गोटे, डॉ.विठ्ठल रोडगे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पूरोहीत, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, शंकर बोरुडे, माणिक लोडे, संतोष टेकाळे, हमीद प्यारेवाले, कैलाश शहाणे, संदीप वाकडे उपस्थित होते. आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले की, २०१४ पूर्वी देशात नैराश्याचे वातावरण होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर देशात 'विश्वासाचे आणि विकासाचे' नवे पर्व सुरू झाले. कलम ३७० हटवणे, भव्य राम मंदिराची निर्मिती, तिहेरी तलाकमुक्ती यांसारखे ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने घेतले. त्याचप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना,आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना आणि शेतकरी सन्मान निधी यांसारख्या थेट जनकल्याणाच्या योजनांमुळे देशातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचला आहे. आज भारत ही जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनली असून, लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या संमेलनाला हिंगोली शहरातील आणि जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील डॉक्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओम योग वर्गाचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**

कै.लक्ष्मणरावजी पाटील सेवाभावी संस्थेच्या पुढाकाराने व पतंजली योग समितीच्या मार्गदर्शनात सुरू झालेल्या हिंगोली येथील तिरुपती नगर भागातील ओम भवन येथील ओम योग वर्गाचा पहिला वर्धापन दिन सामान्य योग अभ्यासक्रमानुसार वर्ग घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला.

पतंजली योग समितीचे राज्य प्रभारी अनिल अमृतवार व भारत स्वाभिमानचे राज्य सहप्रभारी कुंडलिक निर्मले, ओमप्रकाश देवडा सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रकाश सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा,भारत स्वाभिमानचे जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, युवा प्रभारी राजकुमार टिळे, सह प्रभारी अशोक पवार, बालासाहेब हरण, जिल्हा कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, जिल्हा मीडिया प्रभारी राजेश दारव्हेकर, जिल्हा महामंत्री शितल तापडिया व योग शिक्षिका सुषमा होकर्णे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. स्व.ओमप्रकाश देवडा यांच्या पुतळ्याचे पूजन करून बँक परिसरात कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन सावके यांनी केले. बारावा जागतिक योग दिवस उत्साहाने साजरा करण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले. बाबाराव पवार व बालासाहेब हरण यांना योगपीठाकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश काळे यांनी तर आभार प्रदर्शन बालाजी पालवे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तिरुपती नगरातील सर्व योग साधकांनी परिश्रम घेतले. या शिबीरात शहरातील सर्व योग वर्गानी सहभाग घेतला होता.

## धाराशिवमध्ये महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

धाराशिव शहरातील सांजा रोड परिसरात दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.

छाया सुनिल शेरखाने (वय ४४, रा. बापू शेखखाने गल्ली, सांजा रोड, धाराशिव) या १३ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एमएच-२५ एव्हाय-०५४४ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून जात असताना, आर्यन फंक्शन हॉलसमोरील रस्त्यावर अज्ञात दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे काळ्या मण्यांचे गंठन हिसकावून पळ काढला.



याप्रकरणी छाया शेरखाने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### आ. स्वामी यांच्या हस्ते रामपूर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**उमरगा, १५ जून -**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामपूर येथे इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व सॉक्सचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत दासमे, उपसरपंच अनंत भोसले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक महादेव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. आमदार प्रवीण स्वामी यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### डॉ. शालिनी कुरकुलेंचा सत्कार

**लोहारा, १५ जून -**

लोहारा येथील डॉ. शालिनी सारीका राजकुमार कुरकुले यांनी एमबीबीएस पदवी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल हाजी शब्बीर अहमद अन्सारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. गरीब कुटुंबातील शालिनी यांनी कठोर परिश्रमातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आई-वडील व लोहारा शहराचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल हा गौरव करण्यात आला. त्यांचे वडील राजकुमार कुरकुले हे पुणे येथे पीएमटीमध्ये कंडक्टर म्हणून कार्यरत आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेबूब फकीर यांच्यासह विनोद कुरकुले, युसुफ कुरेशी, सादिक फकीर, जाकेर कुरेशी, जिंदाशा फकीर, रमेश रेणके, अन्वर कुरेशी आदी उपस्थित होते.



### लांजेश्वर येथे प्रवेशोत्सव उत्साहात; प्रभात फेरीने दिला शिक्षणाचा संदेश

**भूम, १५ जून -**

भूम तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लांजेश्वर येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवानिमित्त शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांच्या सहभागातून संपूर्ण गावात भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. आपली मुले शाळेत पाठवा आणि शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे अशा घोषणांमधून शिक्षणाचा संदेश देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, शिक्षक, कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा प्रवेशोत्सव खऱ्या अर्थाने 'गावाचा उत्सव' ठरला असून विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## मृगही कोरडाच... पावसाअभावी तुळजापूर तालुक्यात खरीप पेरणी खोळंबली; शेतकरी चिंतेत



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ जून -**

तुळजापूर तालुक्यात यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत. रोहिणीनंतर मृग नक्षत्रातही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बी-बियाणे व खतांची खरेदी करूनही पावसाअभावी शेतकरी पेरणी करू शकत नसल्याने आर्थिक आणि मानसिक ताण वाढला आहे.

हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनवर 'अल निनो'चे सावट असल्याचे संकेत दिले आहेत. त्याचा परिणाम म्हणून पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

मृग नक्षत्र संपत आले तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र आकाश निरभ्र राहून कडक ऊन आणि उष्ण वारे सुरू असल्याचे चित्र आहे.

शेतकऱ्यांनी ऐनवेळी बियाणे व खतांचा तुटवडा होऊ नये म्हणून आधीच खरेदी केली आहे. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पेरण्या रखडल्या आहेत. कृषी विभागाने १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा सल्ला दिला आहे.

त्यामुळे शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

गेल्या वर्षी मृग नक्षत्रातच मोठ्या प्रमाणात खरीप पेरण्या पूर्ण झाल्या होत्या.

यंदा मात्र बियाणे व खतांच्या वाढलेल्या किमतींमुळे आधीच आर्थिक फटका बसलेल्या शेतकऱ्यांसमोर नवीन संकट उभे ठाकले आहे. वेळेवर पेरणी होईल की नाही, याबाबत अनिश्चितता असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

तळपत्या उन्हात शेतातील मशागतीची सर्व कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहेत. मात्र पावसाच्या प्रतीक्षेत त्यांना हातावर हात धरून बसावे लागत आहे.



येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात असून तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

## कानेगाव येथे किरकोळ कारणावरून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे किरकोळ कारणावरून एका व्यक्तीस शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सतीश रमेश भिसे (वय ३८, रा. कानेगाव, ता. लोहारा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १४ जून रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास मुलांना घरी ठेवण्याबाबत आईशी बोलल्याच्या कारणावरून निलेश मधुकर कांबळे, दैवशाली मधुकर कांबळे (दोघे रा. बामणीवाडी) व अनिकेत श्रीमंत कांबळे (रा. कानेगाव) यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच सत्तूरने मारहाण करून गंभीर जखमी केले.

या प्रकरणी अधिकचा तपास पोलिस करीत आहेत.

## कळंबच्या मराठवाडा दूध डेरीवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ जून -**

ग्राहकाकडून प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारीची दखल घेत धाराशिव जिल्हा अन्न व औषध प्रशासनाने कळंब येथील प्रसिद्ध मराठवाडा दूध डेरीवर रविवारी (दि. १४ जून) धडक कारवाई करत छापा टाकला.

या कारवाईदरम्यान डेरीमधील दूध तसेच दुग्धजन्य पदार्थांपैकी दही आणि आईस्क्रीमचे नमुने घेण्यात आले.

संबंधित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यापूर्वीही जिल्ह्यातील एका खवा व्यावसायिकावर कारवाई करून खव्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानंतरची ही धाराशिव जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाची दुसरी मोठी कारवाई मानली जात आहे.



दूध, दही व आईस्क्रीमचे नमुने तपासणीसाठी पाठवले

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात कठोर मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत विविध ठिकाणी छापे, नमुना संकलन आणि तपासणीच्या कारवाया वेगाने सुरू असून भेसळ करणाऱ्यांमध्ये प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

अन्नपदार्थांची गुणवत्ता व ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात येत आहेत.

## कत्तलीसाठी नेण्यात येणारे २८ गोवंशीय जनावरे व चार वाहने जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

नळदुर्ग पोलिसांनी गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत २८ जनावरे आणि चार मालवाहू वाहने जप्त केली आहेत. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजता तुळजापूर-नळदुर्ग मार्गावरील चिवरी पाटी येथे तपासणीदरम्यान ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी विविध मालवाहू वाहनांमध्ये गोवंशीय जनावरे कोंबून, त्यांच्यासाठी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने वाहतूक केल्याचे आढळून आले. या कारवाईत महादेव इंद्रजीत कांबळे (रा. भंडारी), विशाल विकास बनसोडे (रा. वडगाव देव), महादेव गोविंद धाकतोडे (रा. सारोळा) आणि लखन हनुमंत मोटे (रा. काक्रंबा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांमधून ४ जर्सी गायी, ५ रेडे, १ वगार, ८ कालवडी आणि १० खोंडे अशी एकूण २८ गोवंशीय जनावरे आढळून आली. जनावरे आणि चार मालवाहू वाहनांसह सुमारे ६ लाख ४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## 'जलतारा' योजनेला इटकळमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद; तीन दिवसांत १५० पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१५ जून -**

महसूल विभागाच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या 'जलतारा' या महत्त्वाकांक्षी योजनेला तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथे शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विहीर व बोअरवेल पुनर्भरणासाठी सुमारे दीडशेहून अधिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात खड्डे खोदून घेतले असून, 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला गावकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

या योजनेअंतर्गत पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. गावात व्यापक जनजागृती व प्रसिद्धी केल्यामुळे शेतकऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे आणि गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ११ ते १३ जून या कालावधीत दोन जेसीबी मशिनच्या सहाय्याने इच्छुक शेतकऱ्यांच्या शेतात विहीर व बोअरवेलजवळ पुनर्भरण खड्डे घेण्यात आले. अवघ्या तीन दिवसांत सुमारे १५० खड्ड्यांचे काम पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे, उपक्रमाच्या शेवटच्या दोन दिवसांत शेतकऱ्यांचा प्रतिसाद अधिक वाढल्याने जलतारा योजना गावात यशस्वीपणे रुजत असल्याचे चित्र दिसून आले.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्राम महसूल अधिकारी जी.के. तोडकरी, लक्ष्मण पाटील, ग्रा.पं. अधिकारी नितीन कांबळे, मंडळ अधिकारी डी. पी. गायकवाड, सरपंच क्षिरसागर, विनोद सलगरे यांच्यासह श्रीकृष्ण मुळे, राहुल बागडे, दयानंद गायकवाड, केशव गायकवाड, शिवानंद हांडगे, हसन पठाण यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहित केले.

## शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयाविरोधात मंगरूळमध्ये पहिल्याच दिवशी शाळेला टाळे

### मुख्याध्यापकांच्या विनंतीवरून आंदोलनाला स्थगिती...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१५ जून -**

राज्य शासनाने शाळा एकत्रीकरणाबाबत घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे ग्रामस्थांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी, सोमवार (दि. १५ जून) रोजी जिल्हा परिषद प्रशालेला टाळे ठोकून आंदोलन केले.

राज्य शासनाने एकाच कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा, मुलींची शाळा तसेच प्रशाला यांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागेल, शिक्षकांची संख्या कमी होईल तसेच शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांवरही परिणाम होईल, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे.या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करणारे निवेदन मंगरुळ ग्रामस्थांनी दि. १२ जून रोजी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले होते. निवेदनाची दखल न घेतल्यास शाळेला टाळे ठोकून आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्या अनुषंगाने सोमवारी ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकले. मात्र, शैक्षणिक वर्षाचा पहिलाच दिवस असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांनी ग्रामस्थांना आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले.

तथापि, शासनाने शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रांगणात शाळा भरवून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या आंदोलनात गावातील प्रतिष्ठित नागरिक, तिन्ही शाळा व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष, माता-पालक आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

## खामसवाडी जि.प. शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१५ जून -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त नवागत विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वाराची रांगोळी व पुष्पहारांनी सजावट करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती विश्वास कोकणे, पंचायत समिती सदस्या सुवर्णा पाटील, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व गोड पदार्थ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी मानवी कमान करून नवागतांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, पत्रकार व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. ज्ञानोबा काळे यांनी सूत्रसंचालन तर तुकाराम सुरवसे यांनी आभार प्रदर्शन केले. स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## दोन आरोपींकडून ४ गावठी पिस्तुले व जिवंत काडतुसे जप्त

### धाराशिव एलसीबीची धडक कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून ४ गावठी पिस्तुले, ३ जिवंत काडतुसे आणि मोटारसायकलसह एकूण २ लाख ९४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




दि. १३ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार अवैध शस्त्रधारकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. पेट्रोलिंगदरम्यान स्थागुशा पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, बालाजी बबन काळे व आश्रु उर्फ भुऱ्या भिमा काळे हे मोटारसायकल (एमएच-२५ एयू-९४३३) वरून धाराशिवहून बेंबळीकडे जात असून त्यांच्याकडे गावठी पिस्तुले आहेत. माहितीच्या आधारे पथकाने साळुंखे नगर कमानीजवळ सापळा रचला.

रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संशयित मोटारसायकलस्वार दिसताच पोलिसांनी त्यांना अडवून चौकशी केली. पंचासमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींकडून ४ लोखंडी गावठी पिस्तुले व ३ जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच त्यांची मोटारसायकलही जप्त करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे बालाजी बबन काळे (रा. कल्याणनगर, भूम, सध्या गोलेगाव पारधी पेडी) व आश्रु उर्फ भुऱ्या भिमा काळे (रा. जांब, ता. भूम) अशी आहेत.

या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पुढील तपासासाठी पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. अमोल मोरे, पोलीस हवालदार समाधान वाघमारे, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, महिला पोलीस हवालदार शोभा बांगर, पोलीस नाईक अशोक ढगारे तसेच दहीहांडे, शेरखाने आणि मुंगळे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## कनगरा येथे अवैध मद्यसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

कनगरा येथील एका व्यक्तीकडून अवैध विक्रीसाठी साठवून ठेवलेल्या देशी-विदेशी मद्याच्या ४८ सिलबंद बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या. या मद्यसाठ्याची किंमत सुमारे ३ हजार ८४० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

१४ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कनगरा ते कनगरा पाटी रस्त्यालगत घरासमोरील ओट्यावर हा मद्यसाठा अवैधरित्या विक्रीच्या उद्देशाने ठेवलेला असल्याचे आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी मद्यसाठा जप्त करून संबंधित गुन्हा दाखल केला आहे.

# खापराळा-तोरणात मुरूम लुटीचा धुमाकूळ

## गौण खनिज माफीयांची मुजोरी की महसूल विभागाची मर्जी?

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १५ जुन -**

नायागांव तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या बिलोली तालुक्यातील खापराळा - तोरणा परिसरात गौण खनिज उत्खननाच्या नावाखाली सुरूअसलेल्या कथित लुटीमुळे महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.गेल्या काही अनेक दिवसांपासून दिवसभर आणि रात्रीच्या अंधारात ही २२० ह्या सारख्या जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर मुरूम उपसा सुरू असताना महसूल विभागातील अधिकारी मात्र हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवून. शांतता बाळगत असल्याचे स्पष्टपणे चित्र समोर दिसून येत आहे.



गेल्या चार-पाच दिवसांपासून परिसरातदहा बारा टायर असलेल्या अनेक हायवा टिप्पर द्वारे मुरूमाची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याची माहिती खापराळा व तोरणा येथील स्थानिक नागरिकांनी माहिती दिली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या काही रॉयल्टी पावत्यांवर दिनांक आणि वेळच नमूद नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे एकाच पावतीचा वारंवार वापर करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून.शासनाला चुना लावला जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

नियमांनुसार गौण खनिज वाहतुकीसाठी जारी करण्यात येणाऱ्या रॉयल्टी पावत्यांवर दिनांक,वेळ व इतर तपशील स्पष्ट नमूद असणे बंधनकारक आहे. मात्र अशा अपूर्ण पावत्या खुलेआम वापरल्या जात असतील तर त्या कोणाच्या आश्रयाने? कोणाच्या संरक्षणाखाली? असा संतप्त सवाल या परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

स्थानिकांमध्ये अशीही चर्चा आहे की, शंभर-दोनशे ब्रास उत्खननाची परवानगी घेऊन प्रत्यक्षात हजारो ब्रास मुरूम बाहेर काढला जात आहे. जर ही चर्चा खरी असेल तर शासनाचा महसूल कोट्यवधींच्या घरात बुडाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही तलाठी, मंडळ अधिकारी आणि महसूल विभागातील काही वरिष्ठ अधिकारी या बाबीकडे जाणून बुजून दुर्लक्ष का करीत आहेत, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

विशेष म्हणजे उत्खननाचे यंत्र, हायवा टिप्परांची वर्दळ आणि सुरू असलेली वाहतूक हे सर्व काही उघडपणे सुरू असतानाही महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या परिसरातील गौण खनिज माफियांचे दिवसोंदिवस मनो

बल वाढत आहे.तर दूसरीकडे महसूल प्रशासनाची निष्क्रियता कारणीभूत ठरत आहे का, अशी चर्चा आता ग्रामस्थांमध्ये रंगू लागली आहे.

महसूल विभाग झोपला आहे की जाणीवपूर्वक डोळे झाक करीत आहे? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत असून, शासनाचा महसूल वाचविण्या ऐवजी काही मोजक्या घटकांचे आर्थिक हितसंबंध जपले जात आहेत का, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित उत्खनन धारक, वाहतूकदार तसेच जबाबदार महसूल अधिकाऱ्यांची भूमिका तपासावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जनतेतून होत आहे.

दरम्यान, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डीले हे या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे आता संपूर्ण बिलोली तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या नायगांव तालुक्यातील गावातील स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पावसाळ्यापूर्वी जलसंपदा व जलसंधारण प्रकल्पांचा आढावा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ जुन -**



आगामी पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर किनवट-माहूर तालुक्यातील जलसंपदा विभाग व जलसंधारण विभागाच्या विविध प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आमदार भीमराव केराम यांनी आज आढावा बैठक घेतली. यावेळी प्रलंबित कामे, धरणे, बंधारे, कालवे तसेच जलसंधारणाशी संबंधित विविध योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत आमदार केराम यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या व प्रलंबित कामांची माहिती घेतली. पावसाळ्यादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विशेषतः धरणे, बंधारे, जलसाठे व कालव्यांच्या परिसरात नियमित पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

यावेळी जलसंधारण विभागाचे उपविभागीय अधिकारी देसाई, जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी सूर्यवंशी तसेच कालवा निरीक्षक किरण भिसे उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी विभागांतर्गत सुरू असलेल्या कामांची माहिती सादर करत आगामी पावसाळ्यातील नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली.

आमदार भीमराव केराम यांनी प्रशासनाने समन्वयाने काम करून पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी दक्ष राहण्याचे आवाहन केले. तसेच विकासकामांमध्ये गुणवत्ता राखून सर्व प्रलंबित कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले.

या बैठकीमुळे आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा व जलसंधारण विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून नागरिकांच्या सुरक्षिततेसह जलव्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



## प्रशासनाच्या दुर्लक्षावर मातः शेतकऱ्यांनी लोकवर्गणीतून केला ८०० मीटर रस्ता

**हिमायतनगर** -तालुक्यातील बोरगडी शिवार व तांडा क्र. १ येथील २५ ते ३० शेतकऱ्यांचा पारंपारिक रस्ता नाल्याच्या काठाने जात होता. तो खचल्याने पूर्णपणे बंद झाला होता. परिणामी शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत होती. बळीराजा पांदन रस्ता योजनेअंतर्गत रस्ता मिळावा यासाठी गावकऱ्यांनी तहसील कार्यालयात वारंवार अर्ज दिले. तसेच रस्ता अडवल्याप्रकरणी पोलीस स्टेशनलाही दोन अर्ज सादर केले. मात्र, तहसील व पोलीस प्रशासनाने दखल न घेतल्याने शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता. याच कारणावरून शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर एका शेतकऱ्याने माझ्या शेताच्या चारही बाजूंनी रस्ते काढू नयेत, त्याऐवजी मी माझ्या शेताच्या एका बाजूने रस्ता देण्यास तयार आहे, मला न्याय द्या अशी भूमिका घेतली. हा सार्वजनिक रस्त्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक दत्ता काईतवाड व उपसरपंच विलास चव्हाण यांनी पुढाकार घेतला. त्यांनी २५ ते ३० शेतकऱ्यांची बैठक घेऊन एकमताने ठराव विलास काईतवाड यांच्या अध्यक्षतेखाली मंजूर केला. त्यानुसार प्रत्येक शेतकऱ्याने आपापल्या शेतातून रस्त्यासाठी जागा सोडण्याचे मान्य केले. रमेश पैलवान व लक्ष्मण चव्हाण यांनी स्वतःच्या शेतातून रस्ता देण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर सर्व २५ ते ३० शेतकऱ्यांनी रस्त्यासाठी संमती देऊन ठरावावर सह्या केल्या. त्यानंतर शेतकऱ्यांनी लोकवर्गणीतून १,५०,००० रुपये जमा करून गउइ च्या सहाय्याने ८०० मीटरचा कायमस्वरूपी पांदन रस्ता तयार केला आहे. या कामासाठी योगदान देणारे शेतकरी: लक्ष्मण चव्हाण, रमेश पैलवान, शामराव चव्हाण, फुलसिंग चव्हाण, विलास चव्हाण, मोहन हिरामण, शामराव तुकाराम चव्हाण, विलास काईयवाड, सेवानिवृत्त झडख दत्ता काईतवाड, दत्ता राठोड, कृष्णा राठोड, गोविंद चव्हाण, सुभाष चव्हाण, उत्तम राठोड, वामन राठोड, अमोल चव्हाण, गजानन काईतवाॲड. कायमस्वरूपी रस्ता झाल्यामुळे आता पुढील रस्ता घेऊन जाण्यासही शेतकरी तयार झाले आहेत. प्रशासनाने दखल न घेऊनही शेतकऱ्यांनी एकजुटीने व स्वखर्चाने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावल्याने परिसरात त्यांचे कौतुक होत आहे. लोक लोकवर्गणीतून तयार केलेला हा रस्ता कायमस्वरूपी खडीकरण व्हावी व बारमाही रस्ता शेतकऱ्यांना वापरता यावा, यासाठी तहसील कार्यालय व आमदार महोदय यांनी बळीराजा पांदन रस्ता या योजनेत समाविष्ट करावा अशी मागणी बोरगडी येथील शेतकरी व तांडा नं.१ येथील शेतकऱ्यांनी केली आहे

## पावसाच्या स्वागतासाठी शिवारे सज्ज;बळीराजास पावसाची प्रतीक्षा

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १५ जुन -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरात शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व आंतर मशागतीची कामे पूर्ण करून शेत शिवारे पेरणीसठी सज्ज ठेवलेली आहेत.मृग नक्षत्रात फक्त सोसाट्याचा वारा वाहत आहे.आभाळ दाटून आल्यावर घनघोर पावसाची बरसात होण्याचे संकेत असताना कधी कधी चार टिपूस थेंब गाळल्यानंतर पाऊस नाहीसा होतो आहे. पाऊस वेळेवर नाही पडला तर पेरणी लांबणीवर पडेल आणि आपोआप उत्पादनात घट होईल व खरीप हंगामाचे नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे.

गेल्या चार पाच दिवसांपासून तापमान अजूनही तापलेले वाटत असताना, वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण होतो आहे. आभाळी काळेकुट्ट ढग गर्दी करताना दिसून येत आहेत. परंतु, सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पुन्हा ढग अस्ताव्यस्त पांगताना पाहिल्यावर मनात ञागा उत्पन्न होत आहे.वारा आणि चार थेंब कोसळताच राञी अपराञी वीज वारंवार गुल होते आहे.त्यामुळे वृद्ध व इतर नागरिकांसह नवजात बालकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे.गाव परिसरातील नदी,नाले अजुनही रखरखीत कोरडेठाक आहेत.

सुपर अल निनो वादळाचा प्रभाव वातावरणात दिसून येत आहे.काही भागांत उष्णतेचा प्रभाव अधिक तप्त जाणवण्याची चिन्हे आहेत.बळीराजा मोठ्या पावसाच्या चातकप्रतीक्षेत असताना मनातील कालवाकालव चिंतनीय आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार

दि.१८ जून ते २ जुलै या काळात महाराष्ट्रासह इतर भागात मान्सून सक्रिय होण्याचे संकेत मिळत आहेत.पेरणीसाठी मशागत करूण ठेवलेल्या जमिनी अगदी सज्ज असल्याचे गावोगावी चिञ लख्ख आहे. तुरळक काही शेत शिवारात मजुरांच्या टंचाईमुळे अजुनही कचरा वेचणीचे काम सुरू आहे.

डिझेल तुटवड्याचा गुंता आजरोजी कायम जैसे थे च आहे.मान्सून जर वेळेवर कोसळला तर पेरणीच्या कामांना गती मिळणार आहे.जेष्ठ नागरिकांकडून दुष्काळ सदृश स्थिती येईल की काय अशा चर्चेला गाव परिसरातून उधाण येत आहे.

## खत टंचाईच्या प्रश्नावरुन शिवसैनिक आक्रमक

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १५ जुन -**

खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना विक्रेत्याकडून खते मिळत नाही कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने उबाठा पक्षाच्या शिवसैनीकांनी भोकर कृषी कार्यालयात जावून कृषी अधिकारी यांना घेराव घालत खत टंचाई संदर्भात जाब विचारण्यात आला माजी जि.प.सदस्य सूनिल चव्हाण यांनी कृषी विभागाचे भरारी पथक हे नावालाच असल्याचे सांगून यांचे खत विक्रेत्यांशी साटेलोटे असल्याचा आरोप कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्या समोर केला आहे. त्वरित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा शिवसेनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे



दि.११ जुन रोजी भोकर कृषी कार्यालयात उबाठा पक्षाच्या वतीने कृषी अधिकारी दिलीप जाधव यांचेशी चर्चा केली शेतकऱ्यांना खते मिळत नाहीत जादा पैसे दिल्यास खते मिळतात अशा तकारी प्राप्त झाल्याने शिवसेनेचे जिल्हा संघटक सुभाष नाईक किनीकर व माजी जि.प.सदस्य सूनिल चव्हाण यांनी खत विक्रेते व भरारी पथकाचे अर्थिक हितसंबध असल्याने असे प्रकार होत आहेत अशी तक्रार कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्याकडे करण्यात आली.तेंव्हा कृषी अधिकारी जाधव यांनी या संदर्भात मी सर्व डिलरची बैठक घेऊन चर्चा करणार व त्या नंतर पुढील निर्णय घेऊ व कोणाचीही गय करणार नसल्याचे सांगीतले.या वेळी कृषी सहायक कराळे,दिव्यांग सेनेचे तालुकाप्रमुख विठ्ठल देवड, नरसय्या मेंडेवाड, प्रकाश बोंदिरवाड, मानेची भालेराव, संतोष जाधव, सुनील आडे, अंकुश आडे,कांडलीकर, कल्याण कराळे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

**लिंकींगमुळे व्यापाऱ्यांची अडचण : उत्तम देशमूख बटाळकर**

या संदर्भात भोकर सिडस पेस्टिसाईड डिलर्स असोशिएशनचे अध्यक्ष उत्तम देशमूख बटाळकर यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, भोकर शहरात कोणत्याही कृषि दूकानदाराने शेतकऱ्यांकडून जादा पैसे घेत नाहीत शेतकऱ्यांना



खरीप हंगामासाठी लागणारी सर्व खते व बि-बियाणे उपलब्ध आहेत व्यापाऱ्यांना विना लिंकींग शिवाय खते मिळत नाहीत म्हणून अडचण निर्माण होत आहे.तालूक्यातील शेतकऱ्यांना शासन निश्चित केलेल्या दराने खते मिळतील असे सांगीतले.

## जिल्हा परिषद शाळेसमोरील नालीचे बांधकाम मर्यादेपेक्षा उंच ; हजारो विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १५ जुन -**

हदगाव शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल, मुलींचे हायस्कूल तथा केंद्रीय प्राथमिक शाळा समोरील होत असलेल्या नालीची उंची ही मर्यादा पेक्षा जास्त असल्याने शाळेच्या प्रांगणात पावसाळ्यात तळ्यासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता बळावल्याने अंदाजित दोन हजार विद्यार्थ्यांची जिवितास धोका निर्माण झाला असून याची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते अनवर खान म. अली खान व समस्त पालक




वर्ग, हदगावातील गावकरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग हदगाव यांना निवेदनाद्वारे या गंभीर घटनेकडे त्वरित लक्ष देण्याची मागणी केली आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू होताच हदगाव शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल, मुलींचे हायस्कूल आणि कन्या शाळेचे विद्यार्थी असे बालवाडी ते दहावीपर्यंतचे अंदाजे दोन हजार विद्यार्थी या परिसरात वर्दळ असते त्याच ठिकाणी शाळेच्या समोरील मुख्यद्वार जवळ होत असलेल्या नालीचे बांधकाम मर्यादा पेक्षा उंच होत असल्याने या विद्यार्थ्यांना शाळेत येण्या - जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मागील काळात पावसाळ्यात एका शाळकरी विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती ती घटना भविष्यात घडू नये याची वेळीच दखल घ्यावी तरी उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग हदगाव यांनी नालीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित काम थांबविण्यात यावे तसेच विद्यार्थ्यांना कसलाही त्रास होऊ नये याची दखल घ्यावी. सदरील काम हे अंदाजपत्रकानुसार व नियमाप्रमाणे करण्यात यावे जर सदरील बांधकामामुळे कसल्याही प्रकारची शाळेला व विद्यार्थ्यांना असुविधा निर्माण झाल्यास संबंधित विभाग व गुत्तेदार यांच्यावर सर्वस्वी जबाबदारी राहील असा इशारा सुद्धा निवेदनाद्वारे देण्यात आला.

## उपसरपंच साहेबराव पाटील सेलुकर यांना पितृशोक

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १५ जुन -**



शहरालगत असलेल्या गोपाळचावडी (ता. जि. नांदेड) येथील जेष्ठ नागरिक बालाजी भाऊराव सेलुकर पाटील (वय- ६५ वर्षे) यांचे १४ जून रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी सायंकाळी ४ वाजता गोपाळचावडी येथील स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गोपाळचावडी येथील ग्राम पंचायतचे उपसरपंच साहेबराव पाटील सेलूकर यांचे ते वडील होत.

## सावित्रीताई शेवाळकर पुरस्काराने सन्मानित

**नांदेड** -सत्यशोधक विचारमंच आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने २१ वे साहित्य संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे रविवारी पार पडला.



या कार्यक्रमात देगलूर तालुक्यातील सुजायतपूर या गावातील अंगणवाडी सेविका, लेखिका, कवयित्री, गीतकार तथा सामाजिक कार्यकर्त्या सावित्रीताई शेवाळकर यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या अंजलीताई प्रकाशजी आंबेडकर, खासदार रविंद्र चव्हाण, सुप्रसिद्ध कवी साहित्यिक संजय आवटे, ॲॲड. गोरक्ष लोखंडे, नितीन चंदनशिवे, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, नगरसेवक प्रशांत इंगोले, फारूक अहेमद आदी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीताई शेवाळकर यांचा तसेच इतर मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य संयोजक गणेश शिंगे, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, निमंत्रक जी.पी. मिसाळे, संयोजक लालबाजी घाटे, मुख्य सल्लागार ॲॲड. विजय गोणारकर, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे, सत्यशोधक विचारमंचचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर, कार्याध्यक्ष मारोती कदम, सचिव राहुल गवारे, उपाध्यक्ष राज गोडबोले, सहकार्याध्यक्ष एन.टी. पंडित, रमेश कांबळे, शनिदास वाघमारे, प्रभू ढवळे, संजय जाधव, लक्ष्मीकांत हाटकर, अर्चना गवारे,शोभा कोकरे, संध्या जांभळे, रजिता गजभारे, विनोद हाटकर, श्रावण नरवाडे आदींची उपस्थिती होती..

## अमरावतीत धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांचा 'अतुल्य भारत पुरस्काराने' गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुन -**

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात ४० वर्ष्यापासून सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे नांदेडचे धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना प्रतिष्ठेचा 'अतुल्य भारत पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. अमरावती मध्ये राष्ट्रीय प्रज्ञा अलंकरण समारोह एवं संत समागम २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील भव्य सोहळ्यात ॲॲड. दिलीप ठाकूर व सौ. जयश्री ठाकूर यांनी हा राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारला. विशेष म्हणजे हा सन्मान ॲड. ठाकूर यांना प्राप्त झालेला ११४ वा पुरस्कार ठरला आहे.

ज्ञान उदय फाउंडेशन आणि रेडियम टॅलेंट बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स यांच्या संयुक्त विद्यमाने १४ जून २०२६ रोजी अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील संत, विचारवंत, समाजसेवक, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.



यावेळी प्रास्ताविक करताना कार्यक्रमाचे संयोजक ॲड. क्रांती महाजन यांनी ॲड. दिलीप ठाकूर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. ते म्हणाले की, समाजसेवा, धर्मकार्य आणि मानवतेची निःस्वार्थ सेवा यांचा विचार केला तर ॲड. दिलीप ठाकूर हे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. गेल्या २३ वर्षांत त्यांनी २५ लाखांहून अधिक जेवणाचे डबे गरजूंना वितरित करून अन्नदानाचा एक अनोखा विक्रम घडविला आहे.प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी रस्त्यावरचे बेसहारा, असहाय, दुर्बल तसेच मानसिक संतुलन गमावलेले नागरिक यांना सन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास देण्यासाठी गेल्या ७७ महिन्यांपासून अविरतपणे केस-दाढी कटिंग, स्नान, नवीन वस्त्र वितरण आणि प्रोत्साहनपर आर्थिक मदतीचा उपक्रम राबविला जात आहे. गेल्या सात वर्षांत हिवाळ्यात १४ हजारांहून अधिक उबदार चादरी, पावसाळ्यात 'कृपाछत्र' उपक्रमांतर्गत १४ हजारांपेक्षा अधिक छत्र्या आणि 'चरण सेवा' उपक्रमाद्वारे १४ हजार चप्पलांचे वितरण करण्यात आले आहे.

नांदेड शहरात अन्न वाया जाऊ नये आणि कोणीही उपाशी राहू नये या उद्देशाने त्यांनी सुरू केलेला 'भाऊचा मानवता फ्रिज' हा उपक्रम आजही अनेक गरजूंना आधार देत आहे. सामाजिक कार्याबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले असून सत्यगणपती, औंढा नागनाथ, माहूरगड, रत्नेश्वरी यांसारख्या विविध पदयात्रांचे आयोजन करून धर्म, आरोग्य आणि संस्कार यांची जनजागृती केली आहे.'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर गेल्या २६ वर्षांपासून अमरनाथ यात्रेचे आयोजन करून त्यांनी शेकडो ज्येष्ठ नागरिकांना हिमालयातील पवित्र दर्शन घडविले आहे. तसेच गेल्या २५ वर्षांपासून त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त नांदेडमध्ये आयोजित होणाऱ्या भव्य 'गोदावरी गंगा पूजा' उपक्रमात हजारो महिलांचा सहभाग घडवून आणला आहे.

स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, शालेय साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, मोफत औषध वाटप यांसारखे ९० हून अधिक उपक्रम ते वर्ष भरात सातत्याने राबवत आहेत. कोरोना काळातही त्यांनी बाहेरगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत घरपोच अन्नसेवा पोहोचविली.अशा बहुआयामी आणि निःस्वार्थ समाजसेवेबद्दल त्यांना देश-विदेशातील विविध संस्थांकडून आतापर्यंत ११४ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. संपूर्ण भारतात इतक्या व्यापक आणि सातत्यपूर्ण पद्धतीने समाजसेवा करणारे व्यक्तिमत्त्व शोधणे अत्यंत दुर्मीळ आहे, असे गौरवोद्गार ॲड. क्रांती महाजन यांनी काढले.

या पुरस्काराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अमरावती हे ॲड. दिलीप ठाकूर यांचे सासरचे शहर आहे. त्यामुळे आपल्या सासुरवाडीत राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार स्वीकारण्याची संधी मिळाल्याने हा सन्मान त्यांच्या दृष्टीने अधिक भावनिक, संस्मरणीय आणि अभिमानास्पद ठरला आहे.या प्रसंगी सौ. शोभा व विजयसिंह चौहान, सौ.सुषमा व नरेंद्रसिंह चौहान, सौ. शोभा व नंदकिशोरसिंह गौर, राहुल चौहान यांच्या सह अनेक जण उपस्थित होते. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि हितचिंतकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.